महाराष्ट्र विधानसभा

तिसरे अधिवेशन, २०२२

अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

प्रश्नांची एकूण संख्या - ५०

कासार सिरशी (ता.निलंगा, जि.लातूर) या राज्यमार्ग रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत

(१) २९९१६ (१८-०६-२०२१). श्री.अभिमन्यु पवार (औसा) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) निलंगा (जि.लातूर) तालुक्यातील निलंगा ते कासार सिरशी हा कर्नाटक राज्यात जाणारा अत्यंत वाहतूक व वर्दळ असलेल्या रस्त्याची अत्यंत दुरवस्था झाली असून, उक्त रस्ता वाहतुकीस गैरसोयीचा असल्याचे माहे मार्च, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील रस्त्याची सुधारणा करून रस्ता वाहतुकीस योग्य करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी सातत्याने निवेदनाद्वारे मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांच्याकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, निलंगा तालुक्यातील राज्य मार्ग व प्रमुख जिल्हा मार्ग रस्त्यांची एकूण लांबी किती आहे व त्यापैकी किती लांबीचे रस्ते खराब झाल्याने वाहतुकीस गैरसोयीचे झालेले आहेत,

(४) असल्यास, सदरील खराब झालेल्या रस्त्यांची दुरुस्ती करण्यासाठी निधीची आवश्यकता असल्याने, शासनाने निधीची तरतूद करून कामे करण्याबाबत व रस्ता वाहतुकीस योग्य दर्जाचा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. अशोक चव्हाण (२७-०६-२०२२) : (१) नाही.

(२) होय. हे खरे आहे.

(३) राज्य मार्ग लांबी = ११९.९० कि.मी., प्रमुख जिल्हा मार्ग लांबी = २१९.६० कि.मी. रस्ते पृष्ठभागावरील खड्डे भरुन रस्ते वाहतुकीसाठी सुस्थितीत ठेवण्यात आले आहेत.

(४) व (५) निलंगा तालुक्यातील ६ रस्त्याची कामे अर्थसंकल्प मार्च-२०२१ व २ कामे केंद्रीय मार्ग निधी अंतर्गत मंजूर करण्यात आली आहेत. उर्वरित कामे ही सार्वजनिक बांधकाम विभागाचे धोरण निकष, अग्रक्रम व निधी उपलब्धतेच्या मर्यादा यांच्या अधीन राहून हाती घेण्याचे नियोजन राहील.

राज्यात जुलै महिन्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे रस्त्यांची झालेली दुरावस्था

(२) ३२६६८ (११-०१-२०२२) श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात जुलै महिन्यात झालेल्या अतिवृष्टीत प्राथमिक अंदाजानुसार २९० रस्ते बंद पडले असून ४६९ रस्त्यांची वाहतूक खंडित झाली आहे तर १४० पूल पाण्याखाली गेले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने रस्ते व पुलांच्या झालेल्या नुकसानीचा सर्वे केला आहे काय,

(३) असल्यास, सदर रस्ते व पुलांची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. अशोक चव्हाण (२३-०६-२०२२) : (१) हे खरे आहे.

राज्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे राज्यातील रस्ते पाण्याखाली गेले होते. त्यामुळे रस्ते बंद होवून वाहतूक खंडित झाली होती.

(२) व (३) राज्यात अतिवृष्टीमुळे रस्ते व पुलांच्या नुकसानीचा आढावा घेण्यात आला असून त्यानुषंगाने रस्ते व पूल दुरुस्तीकरिता सन २०२१-२२ मध्ये पूरहानी दुरुस्तीअंतर्गत (FDR) रु.७८०.०० कोटी, विशेष दुरुस्तीअंतर्गत (SR) रु.१३५३.०० कोटी, वार्षिक देखभाल दुरुस्तीअंतर्गत (AMC) रु.५०५.०० कोटी व सन २०२२-२३ मध्ये वार्षिक देखभाल दुरुस्तीअंतर्गत (AMC) रु.८३७.९९ कोटी इतक्या रक्कमेची कामांना मान्यता प्रदान करण्यात आली आहे. उपरोक्त मान्यताप्राप्त कामे निधीच्या उपलब्धतेनुसार कार्यान्वित करण्याचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई महापालिकेतील रस्त्यांच्या कामाबाबत

(३) ३३४८४ (२३-११-२०२१). श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा) : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेच्या रस्त्यांच्या कामांच्या तब्बल १२०० कोटींच्या निविदा पालिका प्रशासनाने मागवल्या असून त्यात तब्बल ३० टक्के उणे दराने कामे करून देण्यास कंत्राटदार पुढे आले असल्याने या कामात गैरव्यवहार झाले असल्याने माहे सप्टेंबर २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ३० टक्के उणे दराने कामे करून देण्यात कंत्राटदार तयार असल्याने रस्त्यांच्या दर्जाबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाला असून, मुंबई महापालिका दरवर्षी रस्त्यांच्या कामासाठी हजारो कोटी रुपये खर्च करीत असतानाही अद्यापही मुंबई खड्डे मुक्त झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार सदरहू निविदा प्रक्रियेत सामील होणाऱ्या कंत्राटदारांच्या कामाच्या दर्जाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (२०-०६-२०२२) : (१), (२) व (३) माहे मार्च-एप्रिल २०२१ रोजी रस्ते कामांच्या रु. १२०० कोटीच्या काही निविदा बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत मागविण्यात आल्या होत्या. तथापि कंत्राटदाराने उणे २१ ते उणे ३० दर उधृत केल्यामुळे कामाचा दर्जा राखण्यासाठी सर्व निविदा रद्द करुन नव्याने निविदा मागविण्यात आल्या. त्यानुसार कामाची गुणवत्ता व दर्जाबाबत चोखंदळ राहता येईल याकरिता नवीन निविदेमध्ये बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत खालीलप्रमाणे काही अटी व शर्ती अंतर्भूत करण्यात आल्या आहेत :-

- कंत्राटदाराबरोबर मालाचा पुरवठा करणारे पुरवठादार, कॉंक्रिट तयार करणारे संयंत्र मालक, धुम्रजंतू संयंत्र पुरवठादार मालक यांची जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे.
- कंत्राटदाराने उणे १२% पेक्षा अधिक रक्कम उधृत केल्यास उणे २०% पर्यंत अतिरिक्त १% व उणे २०% पेक्षा जास्त रक्कम उधृत केल्यास २% अतिरिक्त सुरक्षा रक्कम डी.डी. स्वरुपात कंत्राटदाराकडून आगाऊ घेणे.
- गुणवत्ता नियंत्रणसाठी गुणवत्ता व्यवस्थापन संस्थेची नेमणुक करणे
- रस्ते हे दोषदायित्व कालावधीत व निश्चित आयुर्मान या कालावधीत चांगल्या स्थितीत रहावेत याकरिता काम पूर्ण झाल्यानंतर अनुज्ञेय देयकांच्या ८०% रक्कम व उर्वरित २०% रक्कम ही संबंधित रस्ते कामाच्या दोषदायित्व कालावधीत सुरु झाल्यापासून तो पूर्ण होईपर्यंत दरवर्षी प्रमाणामध्ये देणे.

तथापि, बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रात १२०० कि.मी. लांबीचे डांबराचे रस्ते आहेत. मुंबई क्षेत्रात मोठ्या प्रमाणात होणारा पाऊस, शहराची भौगोलिक स्थिती, विविध सेवा उपयोगिता कंपन्यांमार्फत होणारे खोदकाम तसेच डांबराच्या गुणधर्मानुसार पावसाळ्यात पाण्याच्या संपर्कामुळे रस्त्यांना खड्डे पडतात, ही वस्तुस्थिती आहे.

तसेच रस्त्यावर पडलेले खड्डे ४८ तासांत बुजविण्याचा प्रयत्न करण्यात येत असल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील खड्डयांचे प्रमाण कमी करण्याच्या दृष्टीने १२ मी. पेक्षा जास्त रुंदीच्या रस्त्यांचे सिमेंट काँक्रिटीकरणाद्वारे मजबुतीकरण / सुधारणा करण्याचे धोरण बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत अवलंबिण्यात आले आहे. तसेच, सन २०२१-२२ पासून ६ मी. रुंदीवरील रस्त्यांचे टप्प्याटप्प्याने सिमेंट काँक्रिटीकरण करण्यात येत आहे.

तसेच, स्थायी तांत्रिक सल्लागार समिती (STAC) च्या निर्देशानुसार महानगरपालिकेमार्फत रस्ते दुरुस्ती व सुधारण्याची कामे करण्यात येत आहेत असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई येथील संजय गांधी नॅशनल पार्कचा भाग अतिक्रमणांनी व्यापला असल्याबाबत

(४) ३३७६२ (११-०१-२०२२). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई येथील संजय गांधी नॅशनल पार्कचा भाग अतिक्रमणांनी व्यापलेला आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, संजय गांधी नॅशनल पार्क मधील झोपड्पट्टीधारक व स्थानिक आदिवासी यांचे पुनर्वसन करण्यासाठी शासन स्तरावर विविध योजना प्रस्तावित आहेत हे खरे आहे काय, तसेच मुलुंड पश्चिम विभागातील अमरनगर, शंकरटेकडी, हनुमान पाडा, पंचशील नगर अशा विविध वस्त्या संजय गांधी राष्ट्रीय उद्यानालगत असून येथील पात्र रहिवाश्यांचे IN SITU मुलुंड विभागातच पुर्नवसन व्हावे अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पर्यावरणवादी यांची भूमिका व विकासकांची नापसंती यामुळे संजय गांधी नॅशनल पार्क येथे विकासकामे करताना अडथळा निर्माण होत आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, संजय गांधी नॅशनल पार्क येथे अनेक वर्षांपासून होत असलेल्या अतिक्रमणावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. उद्धव ठाकरे (२८-०६-२०२२) : (१) व (२) रिट याचिका क्रमांक ३०५/९५ मधे मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी दिलेल्या निर्देशानुसार संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील पात्र अतिक्रमकांचे व आदिवासी पाड्यांचे उद्यानाबाहेर पुनर्वसन करावयाचे आहे. त्यानुसार पहिल्या टप्प्यात ११६५८ पात्र अतिक्रमकांपैकी ११३५९ अतिक्रमकांचे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणामार्फत नियुक्त विकासकाने संघर्षनगर, चांदिवली येथे बांधलेल्या इमारतीमध्ये पुनर्वसन करण्यात आले आहे. उर्वरित २९९ पात्र अतिक्रमकांचे पुनर्वसन सदनिकांचे उपलब्धतेनुसार करण्यात येणार आहे. तसेच दुसऱ्या टप्प्यात १३४८६ पात्र अतिक्रमकांचे पुनर्वसन प्रस्तावित आहे.

पात्र अतिक्रमकांचे पुनर्वसन जलदगतीने मार्गी लावण्याकरीता दिनांक ३०.०९.२०२१ रोजी मा.मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर पुनर्वसनाकरीता आरे व्यतिरीक्त इतर जागा निश्चित करण्यासाठी मा. मंत्री, पर्यावरण, पर्यटन व राजशिष्टाचार तथा पालक मंत्री, मुंबई उपनगर यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्याचा निर्णय बैठकीमध्ये घेण्यात आला आहे.

(३) हे खरे नाही.
(४) रिट याचिका क्रमांक ३०५/१९९५ मधील मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील पात्र अतिक्रमकांचे पुनर्वसन करण्याची प्रक्रिया सुरु आहे. तथापि नव्याने होणारे अतिक्रमण वेळीच निष्कासीत करण्यात येते.
(५) प्रश्न उदभवत नाही.

राज्यातील महत्वाची पिके तसेच पशुधनाच्या वाणाचे जतन करण्याबाबत

(५) ३३८५५ (११-०१-२०२२). श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्री.चिमणराव पाटील (एरंडोल) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील महत्वाची पिके तसेच पशुधनाच्या वाणाचे जतन करण्यासाठी राज्य शासनाकडून महाराष्ट्र जनूक कोष कार्यक्रम राबविण्यात येत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जैव विविधतेचे जतन करण्यासाठी महाराष्ट्र जनूक कोष (जीनबँक) कार्यक्रम प्रकल्पाचा कार्यपुर्ती अहवाल माननीय मुख्यमंत्री यांना सादर करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अहवालातील शिफारशींचे स्वरुप काय आहे व त्यानुषंगाने महत्वाची पिके तसेच पशुधनाच्या वाणाचे जतन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. उद्धव ठाकरे (२८-०६-२०२२) : (१) होय हे खरे आहे.
(२) मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ०४.१०.२०२१ रोजी आयोजित बैठकीमध्ये राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान अयोगामार्फत महाराष्ट्र जनुक कोष कार्यक्रम प्रकल्पाचा कार्यपुर्ती अहवाल सादर करण्यात आला आहे.
(३) महाराष्ट्र जनुक कोष प्रकल्प हा स्थानिक समुदाय, संशोधन संस्था व शैक्षणिक संस्था यांचे सहभागाने जनुकिय विविधता जतन करणे व त्याचा प्रसार करण्याबाबत वैशिष्ट्यपूर्ण असा प्रकल्प आहे. प्रकल्पामध्ये जैवविविधतेचे संवर्धन करण्याच्या दृष्टीने ७ महत्वपूर्ण घटक निश्चित करण्यात आले आहेत. सदर घटकांनुसार जैवविविधता व पारंपारिक ज्ञानाचे दस्तऐवजीकरण, यशस्वी संवर्धन पध्दतींच्या माहितीचे विश्लेषण करुन प्रमाणीकरण व त्याचा प्रसार करण्यात येणार आहे. याकरीता सदर प्रकल्प कायमस्वरुपी चालु ठेवण्याच्या दृष्टीने आणि जनुक कोषाची व्याप्ती वाढविण्यासाठी मंत्रीमंडळाची मान्यता घेण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उदभवत नाही.

मुंबई शहरातील वरळी कोळीवाड्याचा विकास करण्याबाबत

(६) ३३९१३ (१७-०१-२०२२). श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड) : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वरळी कोळीवाडा हा मुंबईतील सात बेटांपैकी एक असून या कोळीवाड्याच्या विकासाची कामे अनेक वर्षांपासून प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वरळी कोळीवाड्यासाठी शासनाने एखादी विशेष योजना (डीसीआर अंतर्गत) राबवून विकास करण्याची मागणी स्थानिकांनी मा.मुख्यमंत्री महोदय यांच्याकडे माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये वा त्या दरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त मागणीनुसार वरळी कोळीवाड्याच्या विकासाबाबत शासनाची कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (१५-०६-२०२२) : (१) हे खरे नाही.

बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे वरळी कोळीवाडयामध्ये विविध नागरी पायाभूत सुविधा तसेच विविध समाजपयोगी विकास कामे उदा. पायवाटेची सुधारणा, मलनि:सारण वाहीनी, दुरुस्तीची कामे व नविन मलनि:सारण वाहीनीची कामे, नवीन शौचालये इ. कामे महापालिकेच्या आर्थिक वर्षात उपलब्ध होणा-या तरतुदीमधून करण्यात येत असल्याचे तसेच, वरळी परिसरातील ऐतिहासिक पुरातन वारसा असलेल्या वरळी किल्ल्याचे जतन, संवर्धन व किल्ल्याच्या सभोवतालच्या परिसराचे सौदर्यीकरणासह प्रकाशझोत व्यवस्था कार्यान्वित करण्याचे काम महापालिकेने हाती घेतले असल्याचे महापालिकेने कळविले आहे.

(२) व (३) नाही. असे निवेदन प्राप्त झाले नाही.

बृहन्मुंबई विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली-2034 चे विनियम 33(16) मध्ये गावठाण/कोळीवाडा/आदिवासी पाडा यांचे पुनर्विकासासंबंधी तरतूद करण्यात आली असून विनियम 33(16) चे उपखंड (d) मध्ये गावठाण/ कोळीवाडा / आदिवासी पाडा यांचे विकासाकरिता स्वतंत्र तरतूद करण्यासंबंधी प्रस्तावित करण्यात आले आहे. तथापि, सदर उपखंड (d) ची तरतूद प्रलंबित (abeyance) ठेवण्यात आली आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून सदर विनियम 33(16) उपखंड (d) अंतर्गत गावठाण व कोळीवाडा क्षेत्राच्या पुनर्विकासाकरिता स्वतंत्र नियमावलीचे प्रारूप प्राप्त झाले आहे. सदर प्रस्तावाची विभागाचे स्तरावर छाननी करण्यात येत असून त्यानुसार प्रस्ताव विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

ब्रम्हपूरी (जि.चंद्रपूर) येथे वाघांच्या दहशतीत ४०० गावे असल्याबाबत

(७) ३३९४३ (११-०१-२०२२) श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ब्रम्हपूरी (जि.चंद्रपूर) वनविभागांतर्गत एकूण ४०० गावे जंगल परिसरालगत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या भागात नेहमीच वाघांची दशहत आणि भिती कायम असते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यामुळे येथील ६३ गावालगतच्या जंगलव्याप्त क्षेत्रास जाळीचे कुंपण करण्यासाठीचा प्रस्ताव ब्रम्हपूरी वनविभागाकडून शासनाकडे पाठविण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यासंदर्भात शासनाने माहिती घेऊन या प्रस्तावाला तातडीने मंजूरी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.उद्धव ठाकरे (२८-०६-२०२२) : (१) ब्रम्हपूरी वन विभागाचे नियंत्रणाखाली वनक्षेत्रालगत एकूण ३५६ गावे वसलेली आहेत.

(२) ब्रम्हपूरी वनविभागाचे क्षेत्र हे वन व वन्यजीवांनी अतिशय समृध्द आहे. तसेच सदर भाग ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प या संरक्षित क्षेत्राच्या लगत आहे. ब्रम्हपूरी वनविभागातील अनेक गावे ही वनालगत असून तेथील स्थानिकांच्या उदरनिर्वाहाचे साधन प्रामुख्याने शेती आहे. सदर क्षेत्रात वाघांची वाढती संख्या आणि वनालगत असलेली मानवी वस्ती यामुळे मानव-वन्यप्राणी संघर्षाच्या घटनांचे प्रमाणदेखील वाढत आहे.

(३) व (४) ब्रम्हपूरी वन विभागातील जंगलालगतचे गावांमध्ये मानव-वन्यजीव संघर्ष उदभवू नये याकरिता उपाययोजना राबविणेसाठी व्याघ्र भ्रमणमार्गामध्ये येणाऱ्या ६३ गावांकरिता डॉ. श्यामाप्रसाद मुखजी जन-वन विकास योजनेअंतर्गत प्रती गाव रु. २५.०० लक्ष प्रमाणे एकुण रु. १५७५.०० लक्ष निधी सन २०२१-२२ मध्ये वितरीत करण्यात आला आहे.

तथापि, ब्रम्हपूरी वनविभागातील जंगलव्याप्त क्षेत्रास जाळीचे कुंपण करण्याबाबतचा प्रस्ताव शासनास प्राप्त झालेला नाही.
(५) प्रश्न उदभवत नाही.

गुहागर (जि. रत्नागिरी) नगरपंचायत क्षेत्रात खोटे प्रमाणपत्र सादर करून शासनाची दिशाभूल आणि फसवणूक केल्याबाबत

(८) ३५०२३ (०२-०२-२०२२). श्री.भास्कर जाधव (गुहागर) : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गुहागर (जि.रत्नागिरी) नगरपंचायतीने १४ वा वित्त आयोग योजनेंतर्गतच्या कामांची निविदा दिनांक २ नोव्हेंबर, २०१८ रोजी प्रसिध्द करून मंजूर केलेली कामे ही संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेच्या मालकीच्या जमिनीमध्ये असावीत, असा नियम असताना ४१ पैकी ३२ कामे ही नगरपंचायतीच्या मालकीच्या जागेत नसल्याची बाब मुख्याधिकारी, नगरपंचायत गुहागर यांनीच दिनांक १ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास अर्जदार श्री.जयदेव मुरलीधर मोरे (रा. गुहागर) यांना माहितीच्या अधिकाराखालील माहितीमध्ये दिली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबतच्या शासनाने प्रश्नोत्तराच्या दरम्यान दिलेल्या उत्तरामध्ये याप्रकरणी जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांना चौकशीचे आदेश देऊन स्वयंस्पष्ट अभिप्रायासह अहवाल सत्वर सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांच्याकडून सदर प्रकरणी चौकशी अहवाल प्राप्त झाला आहे काय, चौकशीत काय नमूद करण्यात आले आहे व त्यानुषंगाने खोटे प्रमाणपत्र सादर करून कामे मंजूर करून शासनाची दिशाभूल आणि फसवणूक केल्याचे चौकशीत निष्पन्न झाले असल्याने या गंभीर प्रकरणी मुख्याधिकारी, नगरपंचायत गुहागर तसेच सदर कामांना मंजुरी देणाऱ्या प्रक्रियेतील संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) तसेच अहवाल देण्यास विलंब करणाऱ्या संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय ?

श्री. एकनाथ शिंदे (१४-०६-२०२२) : (१) गुहागर नगरपंचायत हद्दीत १४ व्या वित्त आयोग योजनेंतर्गत करावयाच्या “रस्ते, पाखाडी, गटार आणि संरक्षण भिंत” अशा दि.०२/११/२०१८ रोजी प्रसिध्द केलेल्या ४१ कामांपैकी २४ कामांच्या जागा ह्या नगरपंचायत मालकीच्या असल्याची कागदपत्रे उपलब्ध नसल्याची बाब माहिती अधिकारांतर्गत अर्जदारास कळविल्याचे नगरपंचायतीने कळविले आहे.
(२) हे खरे आहे.
(३) सदर प्रकरणाची चौकशी करण्यासाठी जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांनी त्रिसदस्यीय समिती गठीत केली असून समितीने चौकशी अहवाल जिल्हाधिकारी यांचेकडे सादर केला आहे. जिल्हाधिकारी कार्यालयाने सदरचा चौकशी अहवाल शासनास केवळ अग्रेषित केला असल्याने सदर चौकशी अहवालावर स्वयंस्पष्ट अभिप्राय जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांचेकडून मागविण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

पालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर शासनाच्या प्रसिध्दीवरील खर्चात होत असलेली वाढ

(९) ३७७०० (१०-०४-२०२२). श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.रवि राणा (बडनेरा) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात मुंबई, ठाणे, पुणे, नागपूर यासह इतर महापालिका तसेच जवळपास २७ जिल्हा परिषदा यांच्या निवडणुका येत्या वर्षभरात होणार असून महाविकास आघाडी सरकारच्या कामांचा लेखाजोखा सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचावा, यासाठी राज्य शासनाने विशेष प्रसिद्धी मोहीम हाती घेतली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार पहिल्या टप्प्यात जानेवारी ते मार्च, २०२२ या तीन महिन्यांमध्ये प्रसिद्धीसाठी साडेसोळा कोटी रुपये खर्च करण्यात येणार असून गेल्या १६ महिन्यात आघाडी सरकारने अशाच प्रकारे प्रसिद्धीवर १५५ कोटी रुपये खर्च केले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, देशात आणि राज्यात सध्या कोरोनाचा प्रादुर्भाव असताना व राज्याची आर्थिक स्थिती बिकट असताना केवळ प्रसिध्दीवर इतक्या मोठ्या प्रमाणात खर्च करणे उचित नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाची भूमिका काय आहे व खर्चात कपात करण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.उद्धव ठाकरे (१७-०६-२०२२) : (१) होय
(२) पहिल्या टप्यात जानेवारी ते मार्च, २०२२ या तीन महिन्यांमध्ये प्रसिध्दीसाठी रु.१२.६७ कोटी इतका खर्च करण्यात आला असून, गेल्या १६ महिन्यात म्हणजे दि.१ डिसेंबर, २०२० ते दि.३१ मार्च, २०२२ पर्यंन्त प्रसिध्दीवर रु.१२१.३८ कोटी इतका खर्च झाला आहे.
(३) उक्त कालावधीमध्ये आरोग्य खात्याच्या जाहिराती प्रामुख्याने होत्या व त्या व्यतिरिक्त इतर खात्यांच्या जाहिरातीमध्ये कोरोना प्रतिबंध संदेशाचा अधिक भर होता.
(४) वित्त विभागाने कोरोना काळात खर्चावर घालण्यात आलेल्या निर्बंधाच्या अटी व शर्तीनुसार वित्त विभागाची मान्यता प्राप्त करुन व कोरोनाच्या कालावधीत खर्चाबाबत काटकसरीवर भर देवून जाहिराती देण्यात आल्या आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

धुळे जिल्ह्यातील महामार्गांवर होणारे अपघात टाळण्याकरिता उपाययोजना करण्याबाबत

(१०) ३७९३६ (२८-०३-२०२२) श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) धुळे जिल्ह्यातील गत वर्षभरात महामार्गांवर एकूण ६१४ जणांचा अपघात झाला असून ३४० लोकांना आपला जीव गमवावा लागला असल्याचे दिनांक १३ जानेवारी २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर महामार्गांवर वारंवार होणारे अपघात टाळण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. अशोक चव्हाण (२८-०६-२०२२) : (१) पोलिस विभागाकडील प्राप्त अहवालानुसार धुळे जिल्हयात गत वर्षात एकूण ६७५ जणांचा अपघात झाला असून त्यात एकूण ३८२ लोकांना आपला जीव गमवावा लागला आहे.
(२) मोटार अपघातांमध्ये बरेचसे मृत्यू हे दुचाकी वाहन चालकांकडून विना हेल्मेट वाहन चालविणे, दारु पिऊन वाहन चालविणे, विरुध्द दिशेने वाहन चालविणे, अति वेगात वाहन चालविणे, रस्त्याच्या कडेला टेल लॅम्प न लावता वाहन थांबविणे, क्षमतेपेक्षा जास्त प्रवासी वाहतूक करणे वगैरे वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन केल्याने झाल्याचे दिसून येते. यास्तव त्याअनुषंगाने सदर महामार्गावर वारंवार होणारे अपघात टाळण्यासाठी विशेष मोहिम राबवून जनजागृती करण्यात येत असल्याचे पोलीस विभागाकडून कळविण्यात आले आहे.

तसेच क्षेत्रिय स्तरावरुन सदर महामार्गावर आवश्यक त्या ठिकाणी मार्गदर्शक फलक लावून रस्ता वाहतुकीयोग्य ठेवण्यात येत आहे.

याखेरीज अपघात प्रवण क्षेत्रावर पांढरे पट्टे लावण्यात आले आहेत व चौपदरीकरणाच्या सुरु असलेल्या कामामध्ये रस्ता सुरक्षेसंबंधित आवश्यक उपाययोजना कंत्राटदारामार्फत करण्यात येत असल्याचे, प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, धुळे यांनी कळविले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

नेर जवळील (ता.जि.धुळे) पांझरा नदीवरील नवीन पुलाच्या बांधकामास निधी मिळण्याबाबत

(११) ३८००५ (१०-०४-२०२२) श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे तालुक्यातील नेर जवळील पांझरा नदीवर नेर-महाल-नुरनगर आदिवासी वस्तीला जोडणाऱ्या नवीन पुलाचे बांधकाम करण्यात यावे, अशी मागणी स्थानिक ग्रामस्थांनी लोकप्रतिनिधींकडे केली असल्याचे दिनांक १० जानेवारी २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय ?
(२) असल्यास, सदर मागणी लक्षात घेता शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. अशोक चव्हाण (२४-०६-२०२२) : (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) विषयांकित पुलाचे काम हे निकष, मंजूरी व निधी उपलब्धततेच्या अधीन राहून हाती घेण्याचे नियोजन राहील.

औरंगाबाद शहरातील १६८० कोटी रुपयांचा पाणी पुरवठा योजनेबाबत

(१२) ३८१५३ (२५-०४-२०२२). श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व) : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद शहराला राज्य शासनामार्फत पाणी पुरवठा योजनेसाठी १६८० कोटी रुपयांची योजना मंजूर केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या योजनेसाठी ४ फेब्रुवारी, २०२१ रोजी कार्यरंभ आदेश दिला असून काम पूर्ण करण्याचा कालावधी ३ वर्ष असतांना या पाणीपुरवठा योजनेसाठी अदयापपर्यंत निधी वितरीत केलेला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर पाणीपुरवठा योजनांचे जे काम शहरात सुरु आहे त्यासाठी शहरातील जुन्या पाणीपुरवठा योजनेतील शिल्लक पैशांमधून काम सुरु आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर पाणीपुरवठा योजना निधी वितरीत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (२२-०६-२०२२) : (१), (२), (३), (४) व (५) महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानांतर्गत औरंगाबाद शहरासाठी रु. १६८० कोटी किंमतीचा पाणी पुरवठा प्रकल्प माहे सप्टेंबर, २०१९ मध्ये मंजूर करण्यात आला आहे.

सदर प्रकल्पाची कार्यान्वयन यंत्रणा महाराष्ट्र जीवन प्राधिकरण असून त्यांच्याकडून सदर प्रकल्पाचे काम पूर्ण ठेव तत्वावर करुन घेण्यात येणार आहे.

सदर प्रकल्पाची मोठी किंमत विचारात घेता या प्रकल्पास भविष्यात केंद्र शासन पुरस्कृत अमृत २.० अभियानांतर्गत निधी वितरीत करण्याचे प्रकल्प मंजूर करतानाच ठरविण्यात आले आहे.

त्यामुळे पूर्वीच्या समांतर पाणी पुरवठा योजनेसाठी राज्य शासनाने औरंगाबाद महानगरपालिकेला वितरीत केलेल्या केंद्र व राज्य हिश्याच्या निधीतून रु. २०४.४४ कोटी इतका निधी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास वर्ग करण्याच्या सूचना औरंगाबाद महानगरपालिकेस देण्यात आल्या आहेत.

तसेच, भविष्यातील प्रकल्पाची भौतिक तसेच आर्थिक प्रगती विचारात घेऊन अनुज्ञेय निधी शासनामार्फत वितरीत करण्याचे नियोजन आहे.

नागपूर शहरातील सिमेंट रत्यांवरील विदयुत खांबामुळे होणाऱ्या अपघातांबाबत

(१३) ३८३८२ (१०-०४-२०२२) श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरातील रूंदीकरण व सिमेंटीकरण करण्यात आलेल्या रस्त्याचे बांधकामातर्गत झिंगाबाई टाकळी ते गोधनी तथा रामेश्वरी येथील सिमेंट रस्त्यावरील विदयुत खांब रस्त्याच्या बाजुला स्थलांतरित केले नसल्याचे माहे जानेवारी २०२२ वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर खांब स्थलांतरित न करण्याची कारणे काय असून सदर सिमेंट रस्त्यांवरील विदयुत खांबांमुळे नागरिकांना रहदारीस अडचणी निर्माण होत असुन अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नसल्याने विद्युत खांब बाजूला न करण्यास जबाबदार असणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (२४-०६-२०२२) : (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) सद्यस्थितित सार्वजनिक बांधकाम (विद्युत) विभागाकडून विद्युत खांब स्थलांतरित करणे करिता निविदा प्रक्रीया हाती घेण्यात आली आहे. सदर कार्यवाही पूर्ण करुन काम त्वरीत कार्यान्वयीन करण्याचे नियोजन आहे.

राज्यातील अनेक जिल्हयांमध्ये होत असलेली साग वृक्षांची अवैध तोड

(१४) ३८५४५ (१८-०४-२०२२). श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.विश्वनाथ भोईर (कल्याण पश्चिम), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात गत ४ वर्षात सुमारे १ लाख ९ हजार सागाच्या झाडांसह २ लाख ६३ हजार ३२२ वृक्षांची अवैध कत्तल करण्यात आल्याने राज्याचे सुमारे २० कोटी ४३ लाख ५८ हजार रुपयांचे नुकसान झाल्याचे माहे डिसेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पालघर तालुक्यातील वाडा जिल्हयासह अनेक ठिकाणी अवैध मौल्यवान वृक्षांची तोड होत असल्याने साग व खैर हे वृक्ष नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू वृक्षतोडी ठेकेदार व वन कर्मचाऱ्यांच्या संगनमताने होत असल्याचे निदर्शनास आले असून उक्त प्रकरणी आतापर्यंत किती तस्करांना अटक करण्यात आली आहे व त्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. उद्धव ठाकरे (२३-०६-२०२२) : (१) राज्यात गत ४ (सन २०१८ ते सन २०२१) वर्षात सागाची १,२६,७७४ झाडे व इतर १,८०,५४३ झाडे अशी एकूण ३,०७,३१७ इतक्या झाडांची अवैध वृक्षतोड झाली अूसन, सदर अवैध वृक्षतोडीमुळे नुकसानीची किंमत रु.२४ कोटी ६८ हजार इतकी आहे.

(२) जव्हार वनविभागाअंतर्गत पालघर जिल्हयातील वाडा तालुक्यात सन २०२१ मध्ये सागाचे एकूण २१९ व खैराचे ८८ असे एकूण ३०७ झाडांची अवैध वृक्षतोड करण्यात आली आहे. सदर अवैध वृक्षतोडीमुळे नुकसानीची किंमत रु.९ लाख ८ हजार इतकी आहे. तथापि, साग व खैर हे वृक्ष तस्करामुळे नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत हे खरे नाही.

(३) वृक्षतोडी ठेकेदार व वन कर्मचाऱ्याच्या संगनमताने होत असल्याचे निदर्शनास आलेले नाही. सन २०२०-२१ मध्ये जव्हार वनविभागामध्ये अवैध वृक्षतोडी प्रकरणी ८२ तस्करींना अटक करण्यात आले असून, प्रस्तुत गुन्हेकामी त्यांच्यावर न्यायालयात केस दाखल केली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

अमरावती शहरासाठी अमृत - १ या पाणीपुरवठा योजनेतील कामे निकृष्ट दर्जाची केल्याबाबत

(१५) ३८५७८ (०९-०४-२०२२). श्रीमती सुलभा खोडके (अमरावती) : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती शहरासाठी अमृत १ या पाणीपुरवठा योजनेसाठी अंदाजे ११४ कोटी रुपयांचे निधी मंजूर करण्यात आला आह, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या योजनेतून करण्यात आलेली कामे निकृष्ट दर्जाची झाल्याप्रकरणी मुख्य अभियंता, अमरावती जीवन प्राधिकरण यांनी संबंधित कंत्राटदारांवर दंडात्मक कारवाई करण्याचे आदेश दिले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या कामाच्या कंत्राटदारांकडून किती दंड वसूल करण्यात आला आहे व उर्वरित कामे पुर्ण करुन घेण्याबाबत शासनाने कोणते नियोजन केले वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (२२-०६-२०२२) : (१), (२), (३) व (४) केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियानांतर्गत अमरावती शहर पाणीपुरवठा प्रकल्पास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्यात आलेली आहे.

सदर पाणीपुरवठा प्रकल्पाचे काम विहित मुदतीत पूर्ण न केल्यामुळे संबंधित कंत्राटदारावर महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत दंडात्मक कार्यवाही करण्यात आलेली आहे.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत संबंधित कंत्राटदाराकडून रुपये १.९२ कोटी रुपये दंड वसुल करण्यात आला असून उर्वरित कामे पूर्ण करून घेण्यासाठी कंत्राटदारासमवेत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत बैठका घेऊन उर्वरित कामे पूर्ण करण्यात येत आहेत.

पालघर जिल्हयातील दहिसर वनपरिक्षेत्रामध्ये खैरांच्या झाडांची तस्करी होत असल्याबाबत

(१६) ३८६०२ (१०-०४-२०२२) श्री.दौलत दरोडा (शहापूर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पालघर जिल्हयातील दहिसर वनपरिक्षेत्रामध्ये खैरांच्या झाडांची तस्करी होत असल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी स्थानिक ग्रामस्थांनी संबधित अधिकारी श्री. हिरे यांच्या निलंबनाची मागणी केली आहे, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुधीर मुनगंटीवार (२३-०६-२०२२) : (१) हे अंशत: खरे आहे,

पालघर जिल्हयातील दहिसर वनपरिक्षत्रामध्ये खैरांच्या झाडांची तस्करी होत असल्याचे माहे जानेवारी २०२२ मध्ये वा त्यादरम्यान कोणतीही घटना घडलेली नाही.

तथापि माहे डिसेंबर २०२१ मध्ये खैर अवैध वृक्षतोड व अवैध वाहतूक करतांना आढळून आले आहे.

(२) हे खरे नाही,

वन परिक्षेत्र अधिकारी दहिसर यांच्या निलंबनाबाबत स्थानिक ग्रामस्थांकडून कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही.

(३) माहे डिसेंबर २०२१ मध्ये खैर अवैध वृक्षतोड व अवैध वाहतूक करतांना आढळून आल्याने भारतीय वन अधिनियम १९२७ नुसार दि.३१.१२.२०२१ रोजी या प्रकरणी वन गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर वनगुन्हयात एक टाटा टेम्पो पकडण्यात आले असुन त्यासोबत इतर ४ मोटार सायकल जप्त करण्यात आल्या आहेत. वाहनामध्ये खैर नग ३१, घ.मी. ०.८२६ आढळून आले आहे. सदर गुन्हयातील ५ आरोपींना अटक करण्यात आले असुन त्यांना मा. सत्र न्यायालय पालघर येथे हजर करण्यात आले असता ६ दिवस वनकोठडी झाली होती. या प्रकरणात जप्त वाहने सरकार जमा करणेबाबत व संबधित आरोपीविरुध्द न्यायालयीन कार्यवाही सुरु आहे.

सदर प्रकरणी गस्तपथक व सहायक वन संरक्षक (प्रादेशिक व कॅम्पा) पालघर त्यांच्या चमूमार्फत तपासणी करण्यात आली असून चौकशी अहवालानुसार अवैध वृक्षतोड प्रकरणी वनपरिक्षेत्र अधिकारी दहिसर, वनपाल गांजा, वनपाल दहिसर, वनसरक्षक गांजा, वनरक्षक ढेकाळे, वनरक्षक दहिसर, वनरक्षक पारगांव यांच्या विरुध्द विभागीय चौकशीची कार्यवाही सुरु करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

एरंडोल, भडगाव, चाळीसगाव (जि.जळगांव) तालुक्यातील एरंडोल - येवला राज्यमार्गावरील शासकीय मालमत्ता निष्कासित करण्यात आल्याबाबत

(१७) ३८६६३ (२८-०३-२०२२). श्री.चिमणराव पाटील (एरंडोल) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) “हायब्रीड अन्युईटी” (HAMM) योजनेअंतर्गत जळगांव जिल्ह्यातील एरंडोल, भडगाव, चाळीसगाव तालुक्यातील ग्रामीण भागातून जाणारा एरंडोल-येवला राज्यमार्गावरील काही गावांतील शासकीय मालकीची बांधकामे (इमारती) अतिक्रमण म्हणुन निष्कासित करण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासकीय निधीमधून बांधण्यात आलेल्या शासकीय मालमत्ता (इमारती) निष्कासित करतांना शासकीय परवानगी घेण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, नागरी सुविधा म्हणून वापर सुरु असलेल्या शासकीय दवाखाना, बस थांबा निवारा शेड, सार्वजनिक स्वच्छता गृहे, निष्कासित केल्यानंतर नागरिकांसाठी काही पर्यायी व्यवस्था करण्यात आली आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत

श्री. अशोक चव्हाण (२४-०६-२०२२) : (१) हे खरे नाही. सदर रस्त्याचे कामात शासकीय बांधकामे निष्कासित करण्यात आलेली नाहीत.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मिरा-भाईंदर महानगरपालिकेस घनकचरा प्रकल्पासाठी उत्तन येथील जागा हस्तांतरीत करण्याबाबत

(१८) ३८८६५ (१८-०४-२०२२). श्रीमती गीता जैन (मिरा भाईंदर) : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाच्या पारंपारिक उर्जा व पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू ह्या केंद्रीय मंत्रालयाने संयुक्त रीत्या शहरातील घनकचऱ्यापासून ऊर्जा निर्मिती करण्याकरिता महाराष्ट्र राज्यातील १३ महानगरपालिकांच्या नियुक्त्या केलेल्या असून, सदर प्रकरणी काढण्यात आलेल्या अधिसूचनेमध्ये मिरा-भाईंदर शहराचा समावेश आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र शासनाने मिरा-भाईंदर महानगरपालिकेस केवळ घनकचरा प्रकल्पासाठी उत्तन येथील ७५ एकर जागा महानगपालिकेस हस्तांतरण केली असून, त्यापैकी सदरच्या ७०% जागेवर झोपडपट्ट्यांचे अतिक्रमण झाले असून, उक्त अतिक्रमण नष्ट करण्यासाठी महानगरपालिकेने कोणतीही कार्यवाही केलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, घनकचऱ्यापासून ऊर्जा निर्मिती (बायोगॅस प्रकल्प) केंद्र शासनाचा उपक्रम असणाऱ्या हिंदुस्थान पेट्रोलियमतर्फे राबविण्याकरिता मा.मुख्यमंत्री सचिवालय, नगरविकास विभाग व मिरा-भाईंदर महानगरपालिका यांच्याकडे सदरच्या जागेपैकी ५ एकर जागा उपलब्ध करून देण्यासंदर्भात संपर्क साधला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकल्प हिंदुस्थान पेट्रोलियम लि. तर्फे राबविला जाणार असून तो पूर्णपणे मोफत राबविला जाणार असल्यामुळे मिरा-भाईंदर शहर कचरामुक्त होणार असून महानगरपालिकेच्या कोट्यावधी रुपयांची बचत होणार आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकल्पासाठी त्यांना केवळ ५ एकर जागा ३० वर्षाच्या लिजवर उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (२४-०६-२०२२) : (१) हे खरे नाही.

केंद्र शासनाच्या पारंपारिक उर्जा व पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाने घनकचऱ्यापासून ऊर्जा निर्मिती करण्याकरिता महाराष्ट्र राज्यातील १४ महानगरपालिकांचा समावेश केला असून त्यामध्ये मिरा-भाईंदर महानगरपालिकेचा समावेश नाही.
(२) मिरा भाईंदर महानगरपालिकेस जिल्हाधिकारी ठाणे यांच्याकडून घनकचरा प्रक्रिया प्रकल्पाकरीता ३१.४६ हेक्टर जागा प्राप्त झाली आहे. सदर जागेवर काही ठिकाणी अतिक्रमणे झाली आहेत, हि वस्तुस्थिती आहे. तथापी, सदर अतिक्रमणे महानगरपालिकेमार्फत वेळोवेळी हटविण्यात आली आहेत.
(३) हे खरे आहे.
(४) हिंदुस्थान पेट्रोलियम लि. यांनी याबाबत दिनांक १८/११/२०२१ रोजीच्या पत्रात सदर प्रकल्प पूर्णपणे मोफत राबविला जाणार असल्याची बाब नमूद नसल्याचे, महानगरपालिकेने कळविले आहे.
(५) याबाबत महानगरपालिका स्तरावर कोणताही धोरणात्मक निर्णय घेण्यात आला नसल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.

पुणे अहमदनगर प्रामा-५ राष्ट्रीय या महामार्गावर वाहतूक कोंडीमुळे प्रदूषण व अपघाताच्या वाढत असलेल्या समस्या

(१९) ३९०३७ (१०-०४-२०२२) श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे अहमदनगर प्रामा-५ राष्ट्रीय महामार्ग (७५३ एफ) हा प्रमुख रहदारी मार्ग जटिल वाहतूक समस्येने ग्रासला आहे. त्यामुळे नागरिक व उद्योजक रोजच्या वाहतूक कोंडीला, वायू प्रदूषण, कालापव्यय, छोटे-मोठया अपघातांनी त्रस्त झाले असून नगर रोडला वाढत्या अपघातांनी मृत्यूच्या सापळ्याचे स्वरुप आलेले असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वाघोली उपनगरात रस्ता रुंदीकरण, पर्यायी मार्ग दीर्घ काळ प्रलंबित असल्याने याबाबत संबधित स्वराज्य संस्था, कार्यान्वित यंत्रणा निष्क्रिय असून वाघोली मध्येच वाहतूक कोंडी मुख्यत्वे होत आहे, त्यामुळे याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) तसेच पुणे नगर रस्त्यावर मेट्रो योजना राबविण्यास मंजुरी मिळालेली आहे काय तसेच सदर मार्गाचे नियोजन कसे केले आहे व या प्रकल्पास किती खर्च अपेक्षित आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (२२-०६-२०२२) : (१) होय, हे खरे आहे. तथापि वाढत्या अपघाती मृत्यूची नोंद नाही.
(२) पुणे मनपा हद्द ते शिरुर दरम्यान द्विस्तरीय उन्नयन मार्ग (Double Level Corridor) सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करण्यासाठी सल्लागार नियुक्तीची प्रक्रिया राष्ट्रीय महामार्ग विभाग, पुणे यांचेमार्फत प्रगतीपथावर होती.
तथापि, याबाबत दि.१४.०३.२०२२ रोजी मा.मंत्री, रस्ते परिवहन व महामार्ग, मंत्रालय, भारत सरकारकडे झालेल्या बैठकीतील निर्णयानुसार या पुढील कामे हाती घेण्यासाठी सदरचे काम हे भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण (National Highway Authority of India), वारजे, पुणे यांचेकडे सुपुर्त करण्यात येत आहे व पुढील कामे भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण मार्फत करण्याचे नियोजित आहे.
(३) महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन यांचे मार्फत पुणे मेट्रो प्रकल्पांतर्गत वनाज ते रामवाडी या १५.७५ किमी मार्गिकेचे काम प्रगतीत आहे. सद्यस्थितीत या मार्गाचे ७३% काम पुर्ण झाले असून सदरचे काम डिसेंबर २०२२ पर्यंत पूर्ण करणेचे नियोजन आहे. सदर मार्गिका ही पुढे वाघोली पर्यंत विस्तारित करण्याचे प्रस्तावित आहे.
पुणे मेट्रो प्रकल्प पिंपरी-चिंचवड ते स्वारगेट (मार्गिका-१) व वनाज ते रामवाडी (मार्गिका-२) असे एकूण ३३.२८ किमी च्या प्रकल्पाचा पुर्णत्वाचा खर्च रू ११,४२० कोटी इतका आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

पुणे व पिंपरी-चिंचवड शहरात स्मार्ट सिटी योजने अंतर्गत सुरु असलेल्या विकासकामांबाबत

(२०) ३९०५९ (१८-०४-२०२२). श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी) : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे व पिंपरी-चिंचवड शहरात स्मार्ट सिटी योजने अंतर्गत आजतागायत किती रकमेची विकास कामे सुरू व पूर्ण झाली असून यासाठी केंद्र, राज्य, दोन्ही मनपा यांनी किती निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे,
(२) असल्यास, पिंपरी-चिंचवड स्मार्ट सिटी अंतर्गत झालेल्या विकास कामांतील गैरव्यवहाराबाबत लोकसभा, सक्त वसुली मंत्रालये येथे लोकप्रतिनिधी यांनी चर्चा व तक्रारी उपस्थित केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, स्मार्ट सिटीतील १३५३ कोटी रुपयांचे काम टेक महिंद्रा, एल ॲण्ड टी, बी जी शिर्के, बेनेट कोलमेन या कंपन्यांना दिले आहे काय, असल्यास, सदर कंपन्यांनी जाचक अटी लावून स्वतःच्या निविदा कार्यदेश मिळाल्यावर नियम उल्लंघन करून अवैधरित्या उप ठेकेदार नेमले आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, स्मार्ट सिटी अंतर्गत नियमानुसार गठन केलेल्या एसपीव्ही मध्ये कोणाचा समावेश असून, यामध्ये एसपीव्ही चे कार्यधिकार काय आहेत,
(५) असल्यास, स्मार्ट सिटीमध्ये निविदेत बाजार भावापेक्षा अनेक पटींनी किमती वाढवून साहित्य वस्तू खरेदी केल्या असल्याबाबत तक्रारी प्राप्त झाल्या आहेत काय, असल्यास त्यानुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (२२-०६-२०२२) : (१) पुणे शहरामध्ये स्मार्ट सिटी अभियानांतर्गत सद्यस्थितीत एकूण रु. १८३४ कोटींची विकास कामे सुरु असून रु. १४९९.५ कोटींची विकास कामे पूर्ण करण्यात आली आहेत. तर पिंपरी चिंचवड शहरामध्ये एकूण १४१२ कोटींची कामे सुरु असून त्यापैकी रु. १०४.०७ कोटींचे प्रकल्प पूर्ण करण्यात आलेले आहेत.
सद्यस्थितीत पुणे स्मार्ट सिटीकरीता केंद्र शासनाकडून रु.३९२ कोटी, राज्य शासनाकडून रु.१९६ कोटी तर पुणे मनपा कडून रु.१९६ कोटी इतका निधी वितरीत करण्यात आला आहे. तर पिंपरी चिंचवड स्मार्ट सिटीकरीता केंद्र शासनाकडून रु.३९२ कोटी, राज्य शासनाकडून रु.१९६ कोटी तर पिंपरी चिंचवड मनपा कडून रु. १९६ कोटी इतका निधी वितरीत करण्यात आला आहे.
(२) पिंपरी चिंचवड स्मार्ट सिटीबाबत लोकप्रतिनिधींनी लोकसभेमध्ये उपस्थित केलेल्या मुद्यांच्या अनुषंगाने पिंपरी चिंचवड स्मार्ट सिटी विशेष उद्देश वहनाकडून वेळोवेळी उत्तरे देण्यात आली आहेत, तसेच या विशेष उद्देश वहनाकडे सक्त वसुली संचलनालयामार्फत कोणतीही विचारणा झाली नसल्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी, पिंपरी चिंचवड विशेष उद्देश

वहन यांनी कळविले आहे.
(३) पिंपरी चिंचवड स्मार्ट सिटी मार्फत रु. १३८७.३३ कोटी रकमेच्या कार्यारंभ आदेश मे. टेक महिंद्रा, एल ॲण्ड टी, बी जी शिर्के, बेनेट कोलमेन व अँटोस यांना देण्यात आले आहे.

सदर कामाची व्याप्ती मोठी असल्याने नेमलेल्या ठेकेदाराने कार्यादेशातील अटी / शर्ती, तसेच करारनाम्यातील तरतुदीनुसार ज्या घटकांकरीता करारनाम्यामध्ये तरतुद आहे अशाच घटकांकरीता उपठेकेदार नेमल्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी, पिंपरी चिंचवड विशेष उद्देश वहन यांनी कळविले आले आहे.
(४) दिनांक १८ जून, २०१६ च्या शासन निर्णयान्वये स्मार्ट सिटी, विशेष उद्देश वहन संचालक मंडळाची रचना तसेच स्मार्ट सिटी विशेष उद्देश वहनाचे कार्याधिकार याबाबत मार्गदर्शक सूचना देण्यात आलेल्या आहेत.

सदर शासन निर्णयामध्ये नमूद केल्यानुसार एकूण १५ सदस्यांच्या संचालक मंडळाच्या नियुक्तीस मान्यता देण्यात आलेली आहे.

- संबंधित महानगरपालिका ६ संचालक
- महाराष्ट्र शासन ४ संचालक
- केंद्र शासन १ संचालक
- २ स्वतंत्र संचालक
- संबंधित महानगरपालिका आयुक्त
- मुख्य कार्यकारी अधिकारी, एसपीव्ही

केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांमध्ये नमूद केल्यानुसार विशेष उद्देश वहनाच्या कार्याधिकारामध्ये स्मार्ट सिटी प्रकल्पांना मंजूरी देणे, तांत्रिक मुल्यांकन करणे, मार्गदर्शक सूचनांनुसार प्रकल्पांची अंमलबजावणी, संसाधन विकास कार्यक्रमाची अंमलबजावणी करणे, विविध शैक्षणिक संस्था तसेच विकास कार्यासाठी काम करणाऱ्या संस्थांसोबत समन्वय साधणे, कामाच्या दर्जावर नियंत्रण ठेवणे, विविध संस्थांसोबत करार करणे, शुल्क / कर जमा करणे या घटकांचा समावेश आहे.
(५) पिंपरी चिंचवड स्मार्ट सिटीमध्ये निविदेत बाजारभावापेक्षा अनेक पटींनी किंमत वाढवून साहित्य वस्तू खरेदी केल्याबाबत कोणत्याही प्रकारची तक्रार प्राप्त झाली नसल्याने मुख्य कार्यकारी अधिकारी, पिंपरी चिंचवड विशेष उद्देश वहन यांचेकडून कळविण्यात आले आहे.

चिपळूण व गुहागर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील रस्त्यांना दर्जोन्नती मिळण्यात होत असलेल्या विलंबाबाबत

(२१) ३९२९६ (२८-०३-२०२२). श्री.भास्कर जाधव (गुहागर) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिपळूण (जि.रत्नागिरी) तालुक्यातील खेरशेत-कोकरे-कोकरे-नायशी-कळंबुशी-कासे-पेढांबे रस्ता प्रजिमा ३८ या मार्गामध्ये वीर लोहारवाडी ते वीर देवपाट, घेवडेवाडी, बंदरवाडी रस्ता, (ग्रामा १०३) व वीर लोहारवाडी रानपाट वीरबंदर रस्ता (ग्रामा १५८), रामपूर-पाथर्डी-मिरवणे-ओमळी-ढोक्रवली ते रा.मा. क्र. १६३ला जोडणारा रस्ता (इजिमा क्र. १४७), मिरवणे ते गुढे रस्ता इजिमा क्र. ५० व गुढे मोरेवाडी ते कुटगिरी पातीवाडी रस्ता (ग्रामा १६६), निर्व्हाळ ते खरवते रस्ता ग्रामा ८ व तांबी तांबडवाडी रस्ता (ग्रामा क्र. ३८) तसेच गुहागर तालुक्यातील शृंगारतळी मळण ते निवोशी ते पालशेत रस्ता दर्जोन्नती करणे आणि मासु-आवरे-असोरे-कोळवली-भातगाव-राईपूल रा.मा. क्र. १७४ला मिळणारा रस्ता. (इजिमा १५८) या रस्त्यांच्या दर्जोन्नतीची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ५ जुलै, २०२१ व दिनांक २१ डिसेंबर, २०२१ तसेच यापूर्वीही पत्रान्वये मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे व त्यानुषंगाने सातत्याने मागणी करून देखील दर्जोन्नती देण्याबाबत कोणती कार्यवाही केली तसेच उक्त प्रकरणी विलंब करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. अशोक चव्हाण (२४-०६-२०२२) : (१) होय. हे खरे आहे.

(२) रत्नागिरी जिल्ह्यातील चिपळूण तालुक्यातील रामपूर-पाथर्डी-मिरवणे-ओमळी-ढोक्रवली ते रा.मा.क्र. १६३ ला जोडणारा रस्ता (इजिमा क्र-४७), मिरवणे ते गुढे रस्ता इजिमा क्र.५० रस्ता, मासु-आवरे-असोरे-कोळवली-भातगाव-राईपुल रा.मा. क्र.१७४ ला मिळणारा रस्ता. (इजिमा-१५८) या रस्त्यांच्या दर्जोन्नतीचा शासन निर्णय दिनांक १६ मार्च, २०२२ रोजी निर्गमित करण्यात आला आहे.

खेरशेत -कोकरे-कोकरे-नायशी-कळंबुशी-कासे-पेंढाबे रस्ता प्रजिमा-३८ या मार्गामध्ये वीर लोहारवाडी ते वीर देवपाट, घेवडेवाडी, बंदरवाडी रस्ता, (ग्रामा १०३) व वीर लोहारवाडी रानपाट वीरबंदर रस्ता (ग्रामा १५८) व गुहागर तालुक्यातील शृंगारतळी मळण ते निवोशी ते पालशेत रस्ता दर्जोन्नत करण्याबाबतचा प्रस्ताव शासन स्तरावर विचाराधिन आहे.

(३) प्रश्न उदभवत नाही.

राज्यात अल्पसंख्याक विभागाने समाजातील तरुणांसाठी दोन वर्षापूर्वी जाहीर केलेली कौशल्य विकासाची योजना बंद पडल्याबाबत

(२२) ३९३०६ (०१-०४-२०२२). श्री.समिर मेघे (हिंगणा) : सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अल्पसंख्याक विभागाने समाजातील तरुणांसाठी दोन वर्षापूर्वी जाहीर केलेल्या कौशल्य विकासाची योजना बंद पडली असल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अल्पसंख्याक विभागातर्फे दिनांक २६ ऑगस्ट, २०१९ रोजी शासन निर्णय जाहीर करण्यात आला असून देखील निधीची तरतूद केली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ.जितेंद्र आव्हाड (२१-०६-२०२२) : (१) हे खरे नाही.

(२) व (३) राज्यातील अल्पसंख्याक महिला व युवकांना कौशल्य विकासाचे प्रशिक्षण देण्याची योजना शासन निर्णय दि.२६/०८/२०१९ अन्वये कार्यान्वीत करण्यात आली आहे. शासन निर्णय दि.१०/१२/२०२० अन्वये सदर योजना कौशल्य विकास व उद्योजकता विभागाअंतर्गत असलेल्या महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी मार्फत राबविण्यात येत आहे. या योजनेसाठी दरवर्षी निधी अर्थसंकल्पित केला जातो. सन २०२१-२२ या वर्षात रु.६०.०० कोटी एवढा निधी अर्थसंकल्पीत करण्यात आला होता. त्यापैकी रु.२०.०० कोटी निधी शासन निर्णय २१ मार्च, २०२२ अन्वये वितरीत केला आहे. त्यानूसार सदर योजनेची अंमलबजावणी करण्याची कार्यवाही सुरू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई-गोवा महामार्गाचे काम अपूर्ण असल्याबाबत

(२३) ३९६४० (१०-०४-२०२२). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात १० वर्षापासून प्रलंबित असलेले मुंबई-गोवा महामार्ग क्र.६६ या ४७१ कि.मी. लांबीच्या महामार्गाचे चौपदरीकरणाचे सुरु असलेले काम अद्यापही अपूर्णावस्थेत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त महामार्गाच्या एकूण दहा टप्प्यांपैकी माहे फेब्रुवारी, २०२२ पर्यंत किती टप्प्यांची कामे पूर्ण करण्यात आली आहेत व किती टप्प्यांची कामे अद्यापपर्यंत पूर्ण होणे बाकी आहे,
(३) असल्यास, सदरहू महामार्गातील टप्प्यातील रस्त्याची कामे प्रदिर्घ काळ प्रलंबित राहण्याची कारणे काय आहेत व त्यामध्ये काही त्रुटी असल्यास त्या दूर करुन रस्त्याचे काम पुर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे,
(४) असल्यास, सदरहू काम १० वर्षे प्रलंबित राहिल्याने मा.उच्च न्यायालयाने देखील गंभीर ताशेरे ओढले असल्याचे विचारात घेता राज्य शासनाने केंद्र शासनाशी समन्वय साधून उक्त रस्त्याचे प्रलंबित उर्वरित काम विनाविलंब तातडीने पूर्ण करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. अशोक चव्हाण (२८-०६-२०२२) : (१) हे खरे आहे.
(२) मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग क्र.६६ च्या पनवेल ते इंदापूर या ८४ कि.मी.लांबीतील चौपदरीकरणाचे काम केंद्र शासनाच्या भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाच्या (NHAI) अखत्यारीत येते. सदयस्थितीत त्यापैकी सुमारे ६५ कि.मी. (DBM level) लांबीतील चौपदरीकरणाचे काम पूर्ण झाले असल्याचे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, पनवेल यांनी कळविले आहे.

त्याचप्रमाणे मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग क्र.६६ च्या इंदापूर ते झाराप (कि.मी.८४/०० ते कि.मी.४५०/१७०) या एकूण ३६६.१७ कि.मी. (Design Length ३५५.२८५ कि.मी.) लांबीतील चौपदरीकरणाचे काम राज्य शासनाच्या राष्ट्रीय महामार्ग मंडळ, नवी मुंबई यांचेमार्फत (NH,PWD) १० टप्प्यांमध्ये प्रगतीपथावर आहे.

सदरहू १० टप्प्यांपैकी सिंधुदुर्ग जिल्हयातील तळगांव ते झाराप या दोन टप्प्यांतील काम व रत्नागिरी जिल्हयातील कशेडी ते परशुराम घाट व वाकेड ते तळगाव या दोन टप्प्यातील काम मिळून आजमितीस एकूण चार टप्प्यातील काम जवळपास पूर्ण झाले आहे व उर्वरीत ६ टप्प्यांची कामे प्रगतीपथावर आहेत. सदयस्थितीत एकूण सुमारे २२३.९२ कि.मी. लांबीतील चौपदरीकरणाचे काम पूर्ण झाले आहे.
(३) व (४) सदयस्थितीत पनवेल ते इंदापूर या ८४ कि.मी. लांबीतील कामाच्या विलंबास कर्नाळा पक्षी अभयारण्य व संवेदनक्षील क्षेत्रामधील राष्ट्रीय वन्यजीव मंडळ यांची मंजुरी प्राप्त होणे व मौजे काराव येथील भूसंपादन व वडखळ बाहय वळणाकरीता मिठागराची जागा हस्तांतरीत होणे, मौजे नागोठणे व कोलेटी येथील सरकारी जागेवरील अतिक्रमण काढणे, सवलतदाराच्या आर्थिक समस्या इ.बाबी कारणीभूत ठरुन कामाची गती २०१३ ते २०१५ दरम्यान अत्यंत संथ झाली होती. तथापी महाराष्ट्र सरकारच्या सहकार्याने सन २०१६ दरम्यान वरील बहुतांश बाबींची पूर्तता करण्यात आली. तसेच सवलतदाराच्या आर्थिक समस्यांमुळे संथ झालेल्या कामास पुनरुज्जिवित करण्यासाठी (OTFIS) (One Time Infusion Scheme) मधून निधी उपलब्ध करुन देण्यात आल्यानंतर काम सुरु करण्यात येऊन सुमारे ६५ कि.मी. (DBM level) लांबीतील चौपदरीकरणाचे काम पूर्ण झाले आहे. परंतू त्यानंतर सवलतदाराच्या डिफॉल्टमुळे करारनाम्यानूसार, कलम ३७ अंतर्गत सवलत कराराची समाप्ती करण्याचे (Termination) आदेश दिनांक १७.११.२०२१ रोजी निर्गमित करण्यात आले आहेत. तथापि, सवलतदाराने Termination ला दिल्ली उच्च न्यायालयात आव्हान केल्याने सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे, असे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, पनवेल यांनी कळविले आहे.

त्याचप्रमाणे मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग क्र.६६ च्या इंदापूर ते झाराप (कि.मी.८४/०० ते कि.मी.४५०/१७०) या एकूण ३६६.१७ कि.मी. (Design Length ३५५.२८५ कि.मी.) लांबीतील चौपदरीकरणाचे कामास भूसंपादन प्रक्रिया, प्रलंबित भूसंपादन मोबदला वाटप व सदर लांबीतील वनजमिनीमुळे काम करण्यास विलंब झाला आहे. तसेच कोवीड-१९ या साथीच्या विविध निर्बंधांमुळे सदर महामार्गाच्या काही भागातील कामाची गती राखणे शक्य न झाल्याने सदर लांबीतील काम रखडलेले होते.

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग क्र. ६६ चे चौपदरीकरणाचे काम जलगदगतीने पूर्ण करण्यासाठी करण्यात आलेल्या उपाययोजना :-

अ) सदयस्थितीत केंद्रीय रस्ते वाहतूक व राजमार्ग मंत्रालय, नवी दिल्ली यांचे मार्फत प्रलंबीत भूसंपादन मोबदला रक्कम मंजूर करण्यात आली असून भूसंपादन मोबदला रक्कम वाटपाची प्रक्रिया जानेवारी २०२२ पासून केंद्र सरकारच्या भूमीराशी पोर्टल मार्फत प्रगतीत आहे.

ब) वनजमिनीमध्ये काम करण्यासाठी वनविभागामार्फत Stage-I ची मंजुरी प्राप्त झाली असून काम करण्यासाठीची परवानगी प्रक्रिया वनविभागामार्फत प्रगतीत आहे.

क) सदर महामार्गाच्या आरवली ते वाकेड या भागातील कामे वेळेत पूर्ण करण्यासाठी मुळ ठेकेदार मे. एम. ई. पी. कंपनीला सब्स्टीट्यूट करुन सब कॉन्ट्रॅक्टर्सची नियुक्ती करण्यात आली असून सद्यस्थितीत सदर कामे प्रगतीपथावर आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

लातूर जिल्ह्यातील लांबोटा ते तोगटी (निलंगा) येथील रस्त्यांचे काम
हायब्रीड अ‍ॅन्युईटी योजनेतून अत्यंत निकृष्ट केल्याबाबत

(२४) ४०२०४ (१९-०४-२०२२). श्री.संतोष बांगर (कळमनुरी) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर जिल्ह्यातील लांबोटा ते तोगटी (निलंगा) मोडपर्यंत ४४ किलोमीटर रस्त्यांचे काम हायब्रीड अ‍ॅन्युईटी योजनेतून अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाल्याप्रकरणी संबंधित विभागाकडे निवेदनाद्वारे कामाच्या चौकशीची मागणी करुनही दखल न घेतल्यामुळे तालुका अध्यक्ष, देवणी यांनी दिनांक २१ जानेवारी, २०२२ रोजीपासून उपविभागीय अधिकारी कार्यालय, निलंगा येथे बेमुदत आमरण उपोषण करण्याचा इशारा दिला आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आमरण उपोषणासंदर्भात मा.जिल्हाधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभाग, निलंगा, मा.अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, लातूर आदिकडे तालुका अध्यक्ष, देवणी यांनी निवेदन सादर केले आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास, लांबोटा ते तोगटी (निलंगा) मोडपर्यंत ४४ किलोमीटर रस्त्यांच्या कामाची शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,

(४) असल्यास, चौकशीनुसार दोषी असलेल्यांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. अशोक चव्हाण (२४-०६-२०२२) : (१) होय, निवेदन प्राप्त आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) अधीक्षक अभियंता, दक्षता व गुणनियंत्रण मंडळ, औरंगाबाद यांचे मार्फत चौकशी आदेशित करण्यात आलेली आहे. अहवालातील निष्कर्षानुसार पुढील कार्यवाही करणे प्रस्तावित आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या हद्दवाडीच्या प्रस्तावाबाबत

(२५) ४०३५० (१९-०४-२०२२). श्री.श्रीनिवास वनगा (पालघर), श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्रीमती गीता जैन (मिरा भाईंदर), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला) : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात द्रुतगती रेल्वे प्रकल्प, मेट्रो, आंतरराष्ट्रीय विमानतळ यासारख्या प्रकल्पातील परिसराचा जलदगतीने विकास होण्यासाठी व या भागातून पायाभूत सुविधांसह रोजगार निर्मितीच्या स्त्रोतांचा नियोजनबद्ध विकास करण्यासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (एमएमआरडीए) हद्दवाढीचा प्रस्ताव राज्य शासनाकडे मंजूरीसाठी सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रस्तावात ठाणे, पालघर आणि रायगड जिल्ह्यातील किती गावांचा समावेश आहे तसेच महामुंबई क्षेत्रातील सिडकोच्या अखत्यारीत असलेल्या "नैना परिसरातील" काही भागही प्रस्तावात समाविष्ट आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रस्तावातील हद्दवाढीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (२७-०६-२०२२) : (१) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने दि.११.०२.२०२२ च्या पत्रान्वये जि. पालघर मधील ता.तलासरी, ता.डहाणू व ता.वाडा तसेच जि.ठाणे मधील शहापूर व ता. मुरबाड मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने समाविष्ट करणेबाबतचा प्रस्ताव शासनास सादर केला आहे.
(२) उक्त प्रस्तावात जि.पालघर मधील ता.तलासरी, ता.डहाणू व ता.वाडा तसेच जि.ठाणे मधील शहापूर व मुरबाड तालुक्यातील गावांचा समावेश आहे. सिडकोच्या अखत्यारीत असलेला "नैना परिसर अस्तिवातील मुंबई महानगर प्रदेशाचा भाग आहे.
(३) व (४) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावाची छाननी करण्यात येत आहे.

मौजे कापसाळ (ता. चिपळूण,जि.रत्नागिरी) येथील शिव नदीवरील पूलाच्या बांधकामास निधी मिळण्याबाबत

(२६) ४०४७९ (१९-०४-२०२२). श्री.भास्कर जाधव (गुहागर) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे कापसाळ (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) या गावातील फणसवाडी, गायकरवाडी व पायरवाडी या तीन वाडया गावातून वाहणाऱ्या शिवनदीच्या पलीकडे असून नदीवरील कॉजवेची उंची कमी असल्याने अतिवृष्टीच्या काळात कॉजवेवरून पाणी जाते आणि पलीकडील वाडयांचा संपर्क तुटतो, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या कॉजवेच्या ठिकाणी नवीन पूल बांधण्याची ग्रामस्थांची मागणी असून याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी वारंवार पत्रव्यवहार तसेच विविध आयुधांच्या माध्यमातून मागणी केली आहे, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, पूल बांधकामासाठी अपेक्षित असलेला निधी जिल्हा परिषदेकडे उपलब्ध नसल्याने सदर पुलाचे काम सार्वजनिक बांधकाम विभागाने त्यांच्या विभागाकडून प्रस्तावित करण्याबाबत जिल्हा परिषदेने कळविले असल्याचे सन २०१८-१९ च्या पुरवण्यांन्वये तत्कालीन राज्यमंत्री, ग्रामविकास यांनी दिनांक १६ नोव्हेंबर, २०१८ च्या पत्रान्वये कळविले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने शिव नदीवरील पूलाच्या बांधकामास निधी मंजूर करण्याबाबत तसेच सदर कामात विलंब करणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. अशोक चव्हाण (२४-०६-२०२२) : (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) होय, हे खरे आहे.
(४) व (५) प्रश्नांकित पुलाचे काम हे निकष, मंजूरी व निधी उपलब्धततेच्या अधीन राहून हाती घेण्याचे नियोजन राहील.

रत्नागिरी जिल्ह्यातंर्गत रस्त्याच्या दुरुस्ती व पुर्नबांधणी करण्याबाबत

(२७) ४०५२३ (१९-०४-२०२२). श्री.राजन साळवी (राजापूर) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सार्वजनिक बांधकाम विभाग, रत्नागिरी अंतर्गत विशेष दुरुस्तीसाठी व पुर्नबांधणी अंतर्गत ओणी –पाचल- अणुस्कुरा

घाट (ता.राजापूर) रस्त्यांमध्ये खडडे भरणे, ओणी शिवणे साटवली रस्त्याचे खड्डे भरणे तसेच ओणी-पाचल अणुस्कुरा घाट रस्त्याच्या नवीन पुर्नबांधणी आदिंकरिता शासनाकडे प्रस्ताव सादर करण्यात आले आहेत हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त विशेष दुरुस्ती व पुर्नबांधणी अंतर्गत सादर केलेल्या प्रस्तांवाना तात्काळ निधी उपलब्ध व्हावा याकरिता स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.सार्वजनिक बांधकाम मंत्रीमहोदंयाकडे दिनांक १६ सप्टेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास पत्रव्यवहार केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.अशोक चव्हाण (२३-०६-२०२२) : (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) सन २०२१-२२ रस्ते विशेष दुरुस्ती कार्यक्रमांतर्गत विठापेठ मलकापूर अणुस्कुरा ओणी साटवली पावस रस्ता रा.मा. १५० या रस्त्यावरील कि.मी. १३३/४०० ते १६८/४०० रस्त्यासाठी रु.७४३.६२ लक्ष रक्कमेच्या कामास मान्यता प्रदान करण्यात आली आहे. सदर कामाचे कार्यारंभ आदेश दि.११/०५/२०२२ ला देण्यात आले आहेत. सदर काम दि.१०/०५/२०२३ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उदभ्वत नाही.

तहसिल कार्यालय उमरखेड जिल्हा-यवतमाळ येथे प्रशासकीय इमारतीचे बांधकामाकरीता प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत

(२८) ४०५६५ (०१-०४-२०२२). श्री.नामदेव ससाणे (उमरखेड) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उमरखेड (जि.यवतमाळ) तालुक्यातील तहसिल कार्यालय येथे प्रशासकीय इमारतीचे बांधकाम करण्याकरिता प्रशासकीय मान्यता मिळण्याबाबत दिनांक ८ सप्टेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास मा.अपर मुख्य सचिव (महसूल), महसूल व वन विभाग, मंत्रालय यांच्याकडे जिल्हाधिकारी कार्यालय, यवतमाळ यांनी विनंती केली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त विनंतीनुसार शासनाने मान्यता दिली आहे काय, तसेच प्रशासकीय मान्यता देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. रविंद्र चव्हाण (२३-०६-२०२२) : (१) होय, हे खरे आहे.
(२) उमरखेड, जि.यवतमाळ येथील मध्यवर्ती प्रशासकीय इमारतीच्या बांधकामास दि.०५ मार्च, २०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात रु.३.६८ कोटी इतकी तरतुद करण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (राज्यस्तर) योजनेअंतर्गत निलंगा नगर परिषदेस रस्ते विकास कामासाठी निधी मंजूर करण्याबाबत

(२९) ४०७१७ (२०-०४-२०२२). श्री.संभाजी पाटील-निलंगेकर (निलंगा) : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लातूर जिल्ह्यातील निलंगा शहरातून जाणारे राज्य मार्ग क्र .२४४ उदगीर मोड ते लातूर रोड निंबाळकर पेट्रोल

पंपापर्यंचा कॉक्रीट रस्ता, डिव्हायडर व नाल्यासह व बँक कॉलनी मैन रोड डी.पी. रस्ता शिवाजी चौक ते हलकर्षा दर्गा पर्यंतचा राज्य मार्ग क्र.२३८ रस्ता कॉक्रीट व डांबरीकरण नाल्यासह करण्याच्या प्रकल्पास महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचे पत्र क्र.नगरो -२०१९/प्र.क्र .१९३ (१) नवि -३३, दिनांक ०५/०९/२०१९ अन्वये तत्वतः मान्यता मिळालेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त कामांचा सविस्तर प्रकल्प अहवाल (डी.पी.आर.) मंजूरीस सादर करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरील सविस्तर प्रकल्प अहवालाची किंमत रू.७२.८५ कोटी इतकी आहे असून महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (राज्यस्तर) योजनेअंतर्गत निलंगा नगरपरिषदेस निलंगा शहरातील मुख्य रस्ते विकास करणेसाठी निधी उपलब्ध करून देण्यात यावा, अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री यांच्याकडे माहे जानेवारी, २०२० मध्ये लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (२२-०६-२०२२) : (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३), (४) व (५) महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान (राज्यस्तर) अंतर्गत निलंगा शहरातील रस्ते विकास प्रकल्पास निधी उपलब्ध करून देण्याची विनंती स्थानिक लोकप्रतिनिधीनी मा. मुख्यमंत्री यांच्याकडे जानेवारी, २०२० मध्ये निवेदनाद्वारे केली आहे हे खरे आहे.

तथापि, सदर रस्ते प्रकल्पाबाबत प्रस्ताव नगरपरिषदेने नगर परिषद प्रशासन संचालनालयाकडे सादर केलेला असून सदर प्रस्तावात काही बाबींची पूर्तता करून फेरप्रस्ताव सादर करण्याच्या सूचना नगर परिषद प्रशासन संचालनालयामार्फत दिनांक २८.१२.२०२० रोजीच्या पत्रान्वये निलंगा नगरपरिषदेस कळविले असून सद्यस्थितीस सदर प्रस्तावातील त्रुटींची पूर्तता करण्याची कार्यवाही निलंगा नगरपरिषद स्तरावर चालू आहे.

सोलापूर शहरात (ता.जि.सोलापूर) समांतर जलवाहिनी ११० एमएलडीऐवजी १७० एमएलडी करण्याबाबत

(३०) ४०७६१ (२०-०४-२०२२). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर (ता.जि.सोलापूर) शहरात वाढती लोकसंख्या विचारात घेता समांतर जलवाहिनी ११० एमएलडीऐवजी १७० एमएलडी करण्याबाबत महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी प्रस्ताव तयार करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सोलापूर शहरात सद्य:स्थितीत अस्तित्वात असलेल्या जलवाहिन्या जीर्ण झालेल्या असल्याने प्रस्तुत जलवाहिन्या ११० एमएलडीवरुन १७० एमएलडी करण्याबाबतची शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (२२-०६-२०२२) : (१), (२) व (३) सोलापूर शहराच्या पाणी पुरवठयाबाबत आढावा घेण्यासाठी मा. उपमुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीतील चर्चेनुसार सोलापूर वाढीव पाणी पुरवठा योजनेची क्षमता ११० एमएलडी वरुन १७० एमएलडी नुसार योजना प्रस्तावित करण्याबाबत झालेल्या चर्चेनुसार सोलापूर स्मार्ट सिटीमार्फत १७० एम.एल.डी. नुसार योजना प्रस्तावित केलेली असून सदर प्रकल्पाची पुढील आवश्यक कार्यवाही सोलापूर स्मार्ट सिटी मार्फत चालू आहे.

आर्वी (जि.वर्धा) येथील नगर पंचायत आष्टी व नगर पंचायत कारंजा येथील नागरिकांना शुद्ध पाणीपुरवठा करण्याबाबत

(३१) ४०७९९ (२०-०४-२०२२). श्री.दादाराव केचे (आर्वी) : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आर्वी (जि.वर्धा) येथील नगर पंचायत आष्टी व नगर पंचायत कारंजा येथील नविन लोकसंख्येनूसार शुध्दी करणासह नविन पाणी पुरवठा योजना मंजुर करण्याबाबत मागणी करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मौजा कारंजा नगर पंचायत येथे नागरिकांना १० ते १२ दिवसानंतर अशुध्द पाणी पुरवठा केला जातो तर मौजा आष्टी नगर पंचायत येथील जनतेस देखील ९ ते १० दिवस नंतर शुध्द पाणी पुरवठा होत आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन मौजा कारंजा नगर पंचायत येथे नागरिकांना शुध्द पाणी पुरवठा करण्याकरीता कार नदी प्रकल्पावरून नविन पाणी पुरवठा योजना मंजुर करण्याबाबत तसेच मौजा आष्टी नगर पंचायत येथे नागरिकांना शुध्द पाणी पुरवठा करण्याकरीता अप्पर वर्धा धरणाच्या बॅक वॉटर वरून शुध्दीकरणासह नविन पाणी पुरवठा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (२२-०६-२०२२) : (१) होय, हे खरे आहे.

(२), (३) व (४) नगरपंचायत कारंजा येथे सद्यस्थितीस काही वार्डात २ दिवसाआड तसेच काही वार्डात ६ दिवसाआड शुद्ध पाणी पुरवठा करण्यात येत आहे.

तसेच, कारंजा नगरपंचायत क्षेत्रासाठी नवीन पाणी पुरवठा योजना प्रस्तावित करण्याची कार्यवाही कारंजा नगरपंचायतीमार्फत चालू आहे.

आष्टी नगरपंचायत क्षेत्रात नगरपंचायतीमार्फत दररोज शुद्ध पाण्याचा पुरवठा करण्यात येत आहे.

तसेच, आष्टी नगरपंचायत क्षेत्रासाठी नवीन पाणी पुरवठा योजना प्रस्तावित करण्याची कार्यवाही आष्टी नगरपंचायतीमार्फत सुरु आहे.

राज्यात कौशल्य विकास योजना व उद्योजकता योजना राबविण्याबाबत

(३२) ४१०६८ (०९-०४-२०२२). श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट) : सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अल्पसंख्यांक घटकातील तरुणांना आणि महिलांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी राज्य शासनाने कौशल्य विकास योजना व उद्योजकता योजना राबवण्यासाठी दोन वर्षापूर्वी परिपत्रक जाहीर केले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजना कौशल्य विकास व उद्योजकता विभागाच्या कौशल्य विकास सोसायटी तर्फे राबविण्यात येणार आहेत हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,सदर योजना राबविण्यात आली नसल्याने याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ.जितेंद्र आव्हाड (१९-०७-२०२२) : (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) अल्पसंख्याक समुहातील वय वर्ष १५ ते ४५ वयोगटातील महिला व युवकांना रोजगार व स्वयंरोजगाराची संधी प्राप्त व्हावी यासाठी शासन निर्णय दि. १० डिसेंबर, २०२० अन्वये कौशल्य विकास प्रशिक्षण योजना कौशल्य विकास व उद्योजकता विभागाच्या अधिनस्त असलेल्या महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी, मुंबई यांचेमार्फत राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सन २०२०-२१ या वर्षात कोव्हीड-१९ या विषाणू संसर्गामुळे उद्भवलेल्या परिस्थिती व

लावण्यात आलेले निर्बंध यामुळे सदर योजना राबविता येऊ शकलेली नाही. आर्थिक वर्ष २०२१-२२ या वर्षात रु.२०.०० कोटी इतका निधी महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी, मुंबईला उपलब्ध करुन दिलेला आहे. त्यानुसार सदर योजना राबविण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उदभवत नाही.

एटापल्ली व आलापल्ली (जि.गडचिरोली) वन विभागातील अवैध सागवान वृक्षतोड व तस्करी थांबविण्याबाबत

(३३) ४११६९ (१८-०४-२०२२). श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी), श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) एटापल्ली व आलापल्ली (जि.गडचिरोली) वन विभागातील झिमेला-२ कक्ष ५४ येथे सागवान वृक्षाची अवैध वृक्षतोड करुन रुपये ९ लाख किंमतीचे सागवन चोरुन तस्करी होत असल्याचे दिनांक ३१ जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गडचिरोली जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात सागवान असून मागील अनेक वर्षापासून वृक्षाची अवैधरित्या तोड करुन तस्करी होत असल्यामुळे शासनाचे करोडो रुपयाचे आर्थिक नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, एटापल्ली व आलापल्ली वन क्षेत्रातील सागवान वृक्षाची अवैध वृक्षतोड करणाऱ्यांवर कारवाई करुन सागवन वृक्षतोड रोखण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने एटापल्ली व आलापल्ली वन विभागात अवैध वृक्षतोड करणाऱ्यांवर कारवाई करुन सागवान वृक्षतोड व तस्करी थांबविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. उद्धव ठाकरे (२३-०६-२०२२) : (१) आलापल्ली वनविभागातील परिक्षेत्रामध्ये झिमेला-२ चे वनरक्षक व क्षेत्र सहायक हे जंगल गस्त करीत असताना दिनांक ३१.१.२०२२ रोजी राखीव वनक्षेत्रात १२ इसम बैलगाडीसह अवैधरित्या ३ सागवान वृक्ष व इतर २ किसम प्रजाती यांची अवैध तोड करुन घरगुती उपयोगाकरीता वाहतूक करताना निदर्शनास आले. संबंधित वनगुन्हयाची नोंद करुन भारतीय वन अधिनियम १९२७ अंतर्गत १२ आरोपींना ताब्यात घेण्यात आले होते. सदर प्रकरणी अवैध तोड करण्यात आलेला माल वनोपज किंमत १,४०,८०८/- इतका माल जप्त करण्यात आला आहे. तथापि, जप्त वनोपज मालाव्यतिरिक्त वनगुन्हयात इतर जप्त वनोपजाची किंमत रु.५,५०,०००/- रुपये इतकी असून सदर दोन्ही मुद्देमालाची एकूण किंमत रु.६,९०,८०८/- एवढी आहे.
(२) गडचिरोली वनवृत्तामध्ये सन २०१९ मध्ये ६२४.३७९ घ.मी., सन २०२० मध्ये ६५३.७३२ घ.मी. व सन २०२१ मध्ये ८३८.८७६ घ.मी. इतकी तोड झाली असून रु.४१३.३७ लक्ष इतके नुकसान झालेले आहे. त्यापैकी ६७३.३३७ घ.मी. माल जप्त करण्यात आला असून रु.२८६.८५ लक्ष इतकी रक्कम वसूल करण्यात आलेली आहे. ५४९४ इतके वनगुन्हे नोंद करण्यात आलेले असून ३३५ आरोपींना अटक करण्यात आलेली आहे.
(३) सदर प्रकरणी कोणतेही निवेदन प्राप्त झालेले नाही.
(४) सदर प्रकरणी भारतीय वन अधिनियम १९२७ नुसार वनगुन्हा नोंदविण्यात आला असून पुढील चौकशी सुरु आहे. वनसंरक्षणासाठी रात्री तसेच दिवसा नियोजीत गस्त क्षेत्रीय अधिकारी व कर्मचारी मार्फत करणे, २४ नाके व १९ बेस कॅम्प वरील तैनात क्षेत्रिय कर्मचारी व मजूरांकडून २४ तास दक्ष राहून काम करणे, वनोपजाची वाहतूक होत असताना त्याची तपासणी करण्याच्या दृष्टीने तपासणी नाकेद्वारे २४ तास वाहने तपासणीचे काम करणे, नियमितपणे नियत क्षेत्र तपासणी करणे.
(५) प्रश्न उद्धवत नाही.

भिवंडी (जि.ठाणे) तालुक्यातील रस्त्याचे काम निकृष्ट असल्याबाबत

(३४) ४१२३४ (१८-०४-२०२२). श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी (जि.ठाणे) तालुक्यातील आमणे नांदकर रस्ता प्रजिमा ४९ सा.क्र.०/०० ते४/५०० या रस्त्याचे काम सुरु असताना स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी प्रत्यक्ष पाहणी दिनांक २४ जानेवारी, २०२१ रोजी वा त्यासुमारास केल्याचे निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ठिकाणी सार्वजनिक बांधकाम विभागाचा एकही जबाबदार अधिकारी उपस्थित नव्हते तसेच या रस्त्याचे काम अतिशय निकृष्ट दर्जाचे केलेले असुन स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी हे काम बंद करण्याबाबत सूचना दिल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, "साई सिद्धिनाथ" कंस्ट्रक्शन कंपनीला काळया यादीमध्ये टाकून त्यांना देयक अदा करण्यात येऊ नये असा पत्रव्यवहार केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. अशोक चव्हाण (१३-०६-२०२२) : (१), (२) व (३) होय, हे खरे आहे.

(४) सदर रस्त्याच्या प्रगतीत असलेल्या कामावरुन मूदतपूर्व वाहतूक/वर्दळ झाल्याने खराब झालेली लांबी दुरुस्त करण्याबाबत कंत्राटदारास लेखी कळविण्यात आले आहे. खराब झालेल्या रस्त्याची दुरुस्ती करण्यात आली असून, सद्यस्थितीत कामाचे देयक अद्याप कंत्राटदारास अदा करण्यात आलेले नाही.

मौजा विहीरगांव व मुर्ती (जि. चंद्रपूर) येथील प्रस्तावित ग्रीनफिल्ड विमानतळाच्या वनजमिनी हस्तांतरणाबाबत

(३५) ४१३८९ (१९-०४-२०२२). श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्ह्यातील औद्योगिक आणि आर्थिक प्रगतीला चालना देणारा राजुरा तालुक्यातील मूर्ती येथील ग्रीनफिल्ड विमानतळ प्रकल्पाला सन २०१८ मध्ये मंजूरी देण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावित विमानतळासाठी ८४० एकर जमिनीची मागणी महाराष्ट्र विमानतळ विकास प्राधिकरणाने जिल्हा प्रशासनाकडे केलेली असून त्यापैकी ७०० एकर जमीन संपादनाची प्रक्रिया पूर्ण झालेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उर्वरीत १४० एकर जमिनीच्या संपादनाची प्रक्रिया राज्य शासनाकडून महाराष्ट्र विमानतळ विकास प्राधिकरणाला निधी उपलब्ध करुन देण्यात येत नसल्याने प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्य शासनाकडून सदर विमानतळ प्रकल्पासाठी जमीन अधिग्रहणासाठी निधी उपलब्ध करुन देण्यास विलंब होत असल्याची कारणे काय आहेत व किती कालावधीत निधी उपलब्ध करुन उर्वरीत १४० एकर जमिनी अधिग्रहीत करुन प्रत्यक्ष प्रकल्पाच्या कामास सुरुवात होणार आहे,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. उद्धव ठाकरे (२१-०६-२०२२) : (१) होय. हे खरे आहे.

(२) हे खरे नाही, एकूण ४८१ एकर क्षेत्र संपादित करण्यात आले आहे.

(३) हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही

(५) प्रश्न उद्भवत नाही
(६) वन जमिनीच्या निर्वानिकरणाचा प्रस्ताव राज्य शासनाच्या वन विभागाकडून केंद्र शासनास न पाठविण्याचा निर्णय घेतला असल्याचे दिनांक २२/०६/२०२१ च्या पत्रान्वये कळविले आहे त्यामुळे पुढील भूसंपादनाची कार्यवाही तूर्तास स्थगित करण्यात आली आहे.

कोकण किनाऱ्यावर समुद्र धूप प्रतिबंधक बंधाऱ्यांची निर्मिती करण्याबाबत

(३६) ४१५७४ (१०-०४-२०२२). श्रीमती मंदा म्हात्रे (बेलापूर), अॅड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.किसन कथोरे (मुरबाड) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोकण किनाऱ्यावर येणाऱ्या चक्रीवादळाच्या पार्श्वभूमीवर आपत्ती व्यवस्थापनाच्या दृष्टीने कायमस्वरूपी उपाययोजना करण्यासंदर्भात मा.उपमुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २७ मे, २०२१ रोजी झालेल्या बैठकीमध्ये सदर ठिकाणी समुद्र धुपप्रतिबंधक बंधाऱ्यांची निर्मित्ती करण्यासंबंधीचा निर्णय घेण्यात आला असल्याची बाब माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर ठिकाणी धूपप्रतिबंधक बंधारा बांधण्यासाठी लागणाऱ्या निधीची तरतूद करण्यासाठीचा प्रस्ताव अर्थसंकल्प सन २०२१-२०२२ मध्ये समाविष्ट करण्याबाबत मा.उपमुख्यमंत्री यांनी सूचना दिल्या असल्याचे निदर्शनास आले आहे, ही हे खरे आहे काय,
(३) असल्यास, या अनुषंगाने सदर प्रस्तावाची नस्ती विभागीय कार्यालयामार्फत समुद्र धूप प्रतिबंधक बंधारा बांधणे अंतर्गत कामे अर्थसंकल्प २०२१-२०२२ मध्ये समाविष्ट करण्याचे प्रस्ताव संबंधित विभागाला सादर केले आहेत व सदर प्रस्ताव प्रलंबित असल्यामुळे बंधारा उभारण्याची कामात दिरंगाई होत असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, कोकण किनाऱ्यावर आढळणाऱ्या चक्रीवादळाच्या पार्श्वभूमीवर आपत्ती व्यवस्थापनाच्या दृष्टीने कायमस्वरुपी उपाययोजना करण्यासाठी समुद्र धूप प्रतिबंधक बंधाऱ्यांची तातडीने निर्मिती करण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या आहेत वा करण्यात येत आहे,,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. एकनाथ शिंदे (२३-०६-२०२२) : (१) व (२) होय. हे खरे आहे.
(३) व (४) आपत्ती व्यवस्थापनाच्या अनुषंगाने क्षमता बांधणी, पूर्व तयारी आणि सौम्यिकरण प्रकल्प राबविण्याबाबत दि.२३.९.२०२१ रोजी झालेल्या मंत्रीमंडळ बैठकीत घेतलेल्या निर्णयान्वये आपत्ती व्यवस्थापन, महसूल व वन विभाग यांनी कोकण आपत्ती सौम्यीकरण प्रकल्पास मंजूरी देण्याबाबत दि.१०.११.२०२१ रोजी शासन निर्णय निर्गमित केला आहे. कोकण किनारपट्टीवरील जिल्हयात चक्रीवादळासारख्या नैसर्गिक आपत्तीमुळे होणारे नुकसान विचारात घेऊन "कोकण आपत्ती सौम्यीकरण प्रकल्प" या नावाने विशेष प्रकल्प राबविण्यास मंत्रीमंडळाने तत्वत: मान्यता दिलेली आहे. या प्रकल्पामध्ये धूप प्रतिबंधक बंधारे यासाठी होणाऱ्या रु.१५९८.२२ कोटी अंदाजित खर्चास तत्वत: मान्यता देण्यात आली आहे.

तसेच सन २०२२-२०२३ चे अर्थसंकल्पात चक्रीवादळामुळे क्षतीग्रस्त झालेल्या ठिकाणी समुद्र धुपप्रतिबंधक बंधारा बांधण्याची रु.४६.६५ कोटी अंदाजित किंमतीची १२ कामे सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत प्राथम्याने समाविष्ट करण्यात आली आहेत. कोकण आपत्ती सौम्यीकरण प्रकल्पामधून ७५ कामांना मान्यता मिळण्याकरिता संबंधित जिल्ह्यांच्या नियोजन समितीकडे अंदाजपत्रके प्रशासकीय मान्यता व निधी उपलब्धतेसाठी सादर करण्यात आलेली आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

सोलापूर-विजयपूर (ता.जि.सोलापूर) राष्ट्रीय महामार्गावरील सैफुल ते हत्तूर पर्यंत रस्त्याची दुरवस्था झाल्याबाबत

(३७) ४१६०१ (१८-०४-२०२२). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर-विजयपूर राष्ट्रीय महामार्गावरील सैफुल ते हत्तूर (ता.जि.सोलापूर) पर्यंत रस्त्याची दुरवस्था होऊन वाहनचालकांसाठी सदर रस्ता अत्यंत धोकादायक झाला असल्याचे माहे डिसेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या महामार्गावरुन प्रवास करतांना वारंवार अपघाताच्या घटना घडत असून नागरिकांना आपला जीव गमवावा लागत असल्याने सदर महामार्ग दुरुस्त करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. अशोक चव्हाण (२३-०६-२०२२) : (१) अंशत: खरे आहे.
(२) सोलापूर-विजयपूर राष्ट्रीय महामार्ग क्र.५२ वरील सैफुल ते हत्तूर (कि.मी.१०/०० ते कि.मी.१३/३९० लांबी) पर्यंत रस्त्याच्या चौपदरीकरणाच्या कामास केंद्रीय भूतल परिवहन व राजमार्ग मंत्रालय, नवी दिल्ली यांच्याकडून वार्षिक आराखडा २०२०-२१ मध्ये मंजुरी प्राप्त झाली आहे. त्यानुसार सदर कामाकरिता दि.२४.१२.२०२१ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात येऊन काम हाती घेण्यात आले आहे. सदयस्थितीत सदर ठिकाणच्या डाव्या बाजूच्या रुंदीकरणाचे काम पूर्णत्वाच्या स्थितीत असून उर्वरीत काम विहित मुदतीत (११ महिने) पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

याखेरीज सदर रस्त्याच्या दुरावस्थेमुळे अपघात घडू नयेत यादृष्टीने रस्त्यावरील खड्डे दुरुस्ती करण्यात येऊन सद्यस्थितीत रस्ता वाहतुकीस योग्य ठेवण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

भिवंडी निजामपुरा (जि.ठाणे) शहर महानगरपालिकेमध्ये महाराष्ट्र सुवर्ण जंयती नगरोत्स्थान अभियान अंतर्गत भुयारी गटार योजनेत झालेला गैरव्यवहार

(३८) ४१६०६ (२७-०४-२०२२). श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व) : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी निजामपुरा (जि.ठाणे) शहर महानगरपालिकेमध्ये महाराष्ट्र सुवर्ण जंयती नगरोत्स्थान अभियान अंतर्गत भुयारी गटार योजना टप्पा क्र. १ व भुयारी गटार योजना टप्पा क्र. २ मध्ये तांत्रिक सल्लागार म्हणून मे. टंडन अँन्ड असो. / मे.टंडन अर्बन सोल्युशन्स प्रा.लि. यांची नियुक्ती करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास सदर कामांच्या निविदा प्रक्रियेमध्ये अनेक गैरव्यवहार झाले असल्याने सदर प्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधी आणि नागरिकांनी तक्रारी दाखल केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास भिवंडी निजामपुरा शहर महानगरपालिकेमध्ये दि ३०/०४/२०१३ रोजीचा स्थायी समिती ठराव क्र.२३ सदर तांत्रिक सल्लागार यांचे देयके थांबविण्याबाबत व दि.१६/११/२०१३ रोजीचा स्थायी समिती ठराव क्र.५ सदर तांत्रिक सल्लागार विरोधात काळ्या यादीत टाकण्याबाबत ठराव मंजूर झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, तांत्रिक सल्लागारांच्या चुकीच्या धोरणामुळे भिवंडी निजामपुरा शहर महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (२२-०६-२०२२) : (१) महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानांतर्गत मंजूर भिवंडी-निजामपूर भुयारी गटार प्रकल्पाच्या टप्पा-१ चे तांत्रिक सल्लागाराचे काम मे. टंडन अर्बन सोल्युशन्स प्रा.लि. यांना देण्यात आले होते.

तसेच, भुयारी गटार टप्पा-२ चे तांत्रिक सल्ल्लागाराचे काम मे. टंडन अर्बन सोल्युशन्स प्रा.लि. यांना देण्यात आले होते परंतु सदरचे काम त्यांच्याकडून काढून घेण्यात आलेले आहे.

(२), (३), (४) व (५) महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानांतर्गत मंजूर भिवंडी-निजामपूर महानगरपालिकेच्या भुयारी गटार टप्पा-२ प्रकल्पाच्या निविदा प्रक्रियेमधील अनियमिततेबाबत प्राप्त तक्रारीनुसार शासनाने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास चौकशी करुन अहवाल सादर करण्याचे निर्देश शासनामार्फत देण्यात आले होते.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या अहवालामध्ये भिवंडी-निजामपूर महानगरपालिकेच्या टप्पा-२ च्या निविदा प्रक्रियेमध्ये मूळ प्रकल्प अहवालाव्यतिरिक्त इतर आवश्यक जादा बाबींचा समावेश केल्याची बाब समाविष्ट होती.

तदनंतर दिनांक ११ जून, २०१५ रोजीच्या पत्रान्वये काही अटींच्या अधीन राहून भिवंडी-निजामपूर महानगरपालिका कार्यक्षेत्रात भुयारी गटार प्रकल्प टप्पा-२ चे काम पुन्हा सुरु करण्यास परवानगी देण्यात आली.

त्यानुसार दिनांक ०६ जुलै, २०१५ रोजी भिवंडी-निजामपूर महानगरपालिकेमार्फत भुयारी गटार टप्पा-२ चे काम सुरु करण्यात आले.

भिवंडी-निजामपूर मनपा स्थायी समिती ठराव क्र.२३, दिनांक ३०.०४.२०१३ नुसार तांत्रिक सल्लागारांचे देयक थांबविण्याबाबत व स्थायी समिती ठराव क्र. ५, दिनांक १६.११.२०१३ नुसार काळ्या यादीत टाकण्याबाबत ठराव पारित करण्यात आला होता. तसेच, भिवंडी-निजामपूर मनपा स्थायी समिती ठराव क्रमांक २०१, दिनांक १५.०४.२०२० नुसार सदर सल्लागारास काळ्या यादीत टाकण्याचा निर्णय रद्द करण्याचा ठराव पारित झाला आहे असे आयुक्त, भिवंडी-निजामपूर महानगरपालिका यांनी कळविले आहे.

तसेच, मे.टंडन अर्बन सोल्युशन्स प्रा.लि. यांना भुयारी गटार प्रकल्प टप्पा-२ च्या प्रकल्पाचे तांत्रिक सल्लागार म्हणून मनपाने कोणतेही देयक अदा केले नाही.

तसेच, भुयारी गटार प्रकल्पाचे तांत्रिक सल्लागार म्हणून महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांची नेमणूक मनपा मार्फत करण्यात आलेली आहे. त्यामुळे, निविदा प्रक्रियेमध्ये गैरव्यवहार झाल्याचे दिसून येत नाही असे आयुक्त, भिवंडी-निजामपूर महानगरपालिका यांनी कळविले आहे.

मौजे यवत (ता.दौंड, जि.पुणे) येथे शासकीय विश्रामगृहाचे बांधकाम करण्याबाबत

(३९) ४१६६२ (३०-०३-२०२२). ॲड.राहूल कुल (दौंड), श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्री.जयकुमार गोरे (माण) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे यवत (ता.दौंड जि.पुणे) येथे नवीन शासकीय विश्रामगृह बांधण्यासाठी निधी मिळण्याची मागणी मा.लोकप्रतिनिधी यांनी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त ठिकाणी विश्रामगृह बांधण्यासाठी निधी मिळण्याबाबत या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

श्री. एकनाथ शिंदे (२८-०६-२०२२) : (१) होय, हे खरे आहे.

(२) कोविड-१९ च्या संसर्गजन्य रोगाच्या प्रादुर्भावामुळे सन २०२२-२३ या वित्तीय वर्षात राज्याची कर व करेत्तर उत्पन्नातील अपेक्षीत महसूली घट व त्याचे राज्याच्या अर्थव्यवस्थेवर होणारे परिणाम विचारात घेता, अत्यावश्यक कामांची निकड लक्षात घेऊन निधी, निकष व प्राधान्यक्रमानुसार नवीन विश्रामगृहाचे काम हाती घेण्याचे नियोजन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

गडचिरोली जिल्ह्यात गौण वनोपजावर आधारित उद्योग निर्मितीबाबत

(४०) ४१८०७ (३०-०३-२०२२). डॉ.देवराव होळी (गडचिरोली) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली जिल्ह्यात ७०% जमीन जंगलाने व्यापलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येथील जंगलात मोठ्या प्रमाणावर तेंदू, बांबू, मोहफुल, हिरडा, बेहडा, आवळा या सारखे गौण वनोपज मोठ्या प्रमाणावर आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास या जिल्ह्यात गौण वनोपजावर आधारित एकही मोठा उद्योग नसल्याने, येथे उद्योग निर्माण केल्यास स्थानिक बांधवाना मोठ्या प्रमाणावर रोजगार मिळू शकेल याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. उद्धव ठाकरे (२२-०६-२०२२) : (१) हे खरे आहे.

गडचिरोली जिल्हयात सुमारे ७७.७७% जमीन वनाने व्यापलेली आहे.

(२) हे खरे आहे.

(३) गडचिरोली जिल्हयात वनावर आधारीत आष्टी येथे पेपर मिल आहे. तसेच बांबू आधारीत प्लाय बोर्ड तयार करण्याच्या प्रकल्पाचे काम सुरु आहे. तसेच वनविभागाचे पुढाकाराने गडचिरोली अगरबत्ती प्रकल्प, गोंडवाना हर्बस् प्रकल्प, मोहा प्रक्रिया उद्योग राबविण्यात येत आहे. वनावर आधारीत उद्योग उभारणीस चालना मिळावी यासाठी वनाधारीत औद्योगिक धोरण निश्चित करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

सिंदखेडा (जि.धुळे) तालुक्यातील गावातील हायब्रीड अन्युईटी तत्वावरील रस्त्यांच्या कामांना निधी न दिल्यामुळे रस्त्यांची झालेली दुरवस्था

(४१) ४१९४० (१८-०४-२०२२). श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हायब्रीड अन्युईटी तत्वावरील सिंदखेडा (जि.धुळे) तालुक्यातील सुकवद, सिंदखेडा, चिमठाणे, दुसाणे, विहीरगांव आणि चिमठाणे ते खलाणे या दोन अत्यंत महत्त्वाच्या रस्त्यांची कामे प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रत्यक्ष झालेल्या कामाच्या मोजमापनुसार देयके मिळण्यासाठी सबंधीत ठेकेदारांनी मागणी करून देखील शासनाकडून केवळ १० टक्के देयक अदा करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त रस्त्याचे काम बंद असल्याने त्याठिकाणी मोठया प्रमाणावर अपघातांचे प्रमाण वाढले असून ग्रामस्थांना येण्या-जाण्यासाठी त्रास सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी रस्त्यांची कामे तातडीने व्हावीत म्हणून शासनाने निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. रविंद्र चव्हाण (२४-०६-२०२२) : (१) करारनाम्याच्या शर्तीनुसार सदर काम हे पाच माईल स्टोन (टप्प्यात) मध्ये करण्यात येणार आहे. त्यापैकी दि. ३१/१२/२०२१ पर्यंत ३ माईल स्टोनचे काम पुर्ण झालेले आहे. उर्वरीत दोन माईल स्टोनचे काम माहे जुलै, २०२२ पर्यंत पुर्ण करण्याचे नियोजन आहे.

(२) हे खरे नाही.

उद्योजकास शासन सहभागाचे पहिला, दुसरा व तीसरा माईल स्टोनचे कामापोटी करारनाम्याच्या शर्तीप्रमाणे रु.६५.३७ कोटी रक्कम देय होती. त्यापैकी रु.६४.७१ कोटी एवढ्या रकमेचे देयक उद्योजकास अदा करण्यात आले आहे.

(३) सदरचे काम प्रगतीत असल्यामुळे, त्या ठिकाणी ग्रामस्थांना येण्या-जाण्यासाठी वाहने सावकाश चालवावी लागतात.
(४) कामाच्या प्रगतीनुसार देयक अदा करण्यात आलेले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

पुणे – अमहमदनगर रस्त्यावर होत असलेली वाहतूक कोंडी

(४२) ४२१२५ (१८-०४-२०२२). ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे- अहमदनगर महामार्गावरील वाहनांची वाघोली व शिक्रापुर या गावांवरुन जात असताना वाहतूक कोंडीमुळे गैरसोय होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या रस्त्यावरुन विदर्भ मराठवाडयाकडे जाणाऱ्या वाहनांची संख्या दिवसेंदिवस वाढत असून वाघोली ते शिरुर दुमजली उड्डाणपूलाचे कामास मंजूरी मिळालेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वाघोली व शिक्रापुर येथील वाहतूक कोंडीची समस्या सोडण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. रविंद्र चव्हाण (२२-०६-२०२२) : (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) दि.१४.०३.२०२२ रोजी मा. मंत्री, रस्ते परिवहन व महामार्ग, मंत्रालय, भारत सरकार यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीतील निर्णयानुसार पुणे मनपा हद्द ते शिरुर दरम्यान द्विस्तरीय उन्नयन मार्ग चे काम भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण (National Highway Authority of India) यांचेमार्फत करण्याच्या सुचना निर्गमित करण्यात आल्या. सद्य:स्थितीत पुढील कार्यवाही भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण मार्फत करण्याचे नियोजित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

अमरावती महानगरपालिका क्षेत्रातील संजय गांधी नगर न. २ येथील
घरे व जागा नियमित करण्याच्या प्रस्तावाबाबत

(४३) ४२२६६ (१८-०४-२०२२). श्री.रवि राणा (बडनेरा) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती महानगरपालिका क्षेत्रातील संजय गांधी नगर न.२ येथील घरे व जागा नियमित करण्याबाबतचा प्रस्तावास मान्यता देण्यात यावी याकरिता केंद्रीय मंत्री यांनी त्यांचे कार्यालयाचे आदेश आ.शा. पत्र संख्या ७-१८/२०२१-एम्पी, व पत्र क्रमांक आ, शां. पत्र क्रमांक ७.१८,२०२१ दि. २७ जानेवारी २०२२ रोजीच्या पत्रान्वये राज्य शासनाच्या वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांना जागा नियमित करण्याचे आदेश दिले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, संजय गांधी नगर जागेच्या विषयासंदर्भात वनविभाकडून पुढील तातडीची कार्यवाही सुरू झाली असून या ठिकाणच्या हजारों नागरिकांना न्याय मिळणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त मागणी केंद्र शासनाकडे व राज्य शासनाकडे कोणी केली आहे ज्यामुळे हजारो नागरिकांना न्याय मिळणार असून शासनाने यासंदर्भात आदेश निर्गमित केले आहेत काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.उद्धव ठाकरे (२३-०६-२०२२) : (१), (२) व (३) संजय गांधी नगर न. २ येथील घरे, जागा, नियमित करण्यासंदर्भात बैठक आयोजित करण्यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधींनी केलेल्या विनंतीच्या अनुषंगाने केंद्र शासनाने

उचित कार्यवाही करण्याबाबत दि.२७.१२.२०२१ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे. अमरावती महानगरपालिका क्षेत्रातील संजय गांधी नगर नं. २ येथील वनक्षेत्रावरील अतिक्रमणांच्या अनुषंगाने आयुक्त, अमरावती महानगरपालिका यांनी दि.२६.०९.२०१९ रोजीच्या पत्रान्वये वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत ५.२६ हे. वनजमीन वळतीकरणाबाबतचा प्रस्ताव उपवनसंरक्षक, अमरावती यांच्या कार्यालयास सादर केला आहे. सदर प्रस्तावामधील त्रूटींची पूर्तता करण्याबाबत कळविल्यानंतर आयुक्त, अमरावती महानगरपालिका यांनी प्रस्तावाची सुधारीत माहिती दि.०९.१२.२०२१ रोजी उपवनसंरक्षक यांच्याकडे सादर केली आहे. सदर प्रस्तावाची छाननी करण्यात येत आहे. सदर प्रस्ताव ऑनलाईन पध्दतीने PARIVESH प्रणालीवर सादर होताच वन विभागामार्फत पुढील कार्यवाही करणे संकल्पित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

हदगाव (जि.नांदेड) तालुक्यातील वारंगा-महागाव राज्य रस्ते महामार्गावर नवीन पुल उभारण्याबाबत

(४४) ४२४४२ (१८-०४-२०२२). श्री.माधवराव पवार (हदगाव) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हदगाव तालुक्यातील (जि.नांदेड) वारंगा-महागाव राज्य रस्ते महामार्गातील पळसा-बरडशेवाळा जवळील पूल तसचे मानवाडी फाटा येथे असलेल्या व अन्य ठिकाणच्या जुन्याच पुलावर नवीन पुल उभारण्यात आल्याची बाब माहे जानेवारी, २०२२ रोजीच्या वा त्यासुमारास निदर्शनास आले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी चौकशीत काय आढळून आले त्यानुसार कन्स्ट्रक्शन कंपनीवर व संबंधितावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. अशोक चव्हाण (२८-०६-२०२२) : (१) वारंगा ते महागांव राष्ट्रीय महामार्ग क्र. ३६१ चे काम केंद्र शासनाच्या भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणामार्फत प्रगतीपथावर आहे.

हे खरे नसून वारंगा ते महागांव राष्ट्रीय महामार्गाचे काम कंसेशन ॲग्रीमेंट व MoRTH Specification नुसार होत आहे. त्यानुसार मानवाडी फाटा जवळील चैनेज क्र.२७७.०१९ कि.मी.डावी बाजू अस्तित्वातील जुना पूल (३X५.८० मिटर) व पळसा-बरडशेवाडा जवळील चैनेज २७१.४०१ कि.मी.उजवी बाजू अस्तित्वातील जुना पूल (३X६.०० मिटर) यांचे पुनर्वसन करण्यात आले आहे व त्या ठिकाणी अधीकचे २ लेन पूल निर्माण करण्यात आले आहेत. सदरील प्रकल्पामध्ये एकूण १६ ठिकाणी जुन्या पूलांचे पुनर्वसन करुन अधिकचे २ लेन पूल निर्माण करण्यात आले आहेत, असे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, नांदेड यांनी कळविले आहे.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील मुस्लिम समाजाच्या आरक्षणाबाबत

(४५) ४२४९४ (०९-०४-२०२२). श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव) : सन्माननीय अल्पसंख्यांक विकास मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) न्यायमूर्ती राजेंद्र सच्चर समितीने केंद्र शासनास अनुक्रमे सन २००६, २००९ मध्ये न्यायमूर्ती रंगनाथ मिश्रा यांचा अहवाल तसेच सन २०१३ मध्ये मेहमुद ऊर रहेमान समितीचा अहवाल या सर्व अहवालांमध्ये, मुस्लिम समाजाचे शैक्षणिक, आर्थिक व सामाजिक मागासलेपणा अधोरेखित करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१४ मध्ये मा.उच्च न्यायालयाने मुस्लिम आरक्षणास मान्यता देऊनही मुस्लिम समाजास आरक्षण अद्याप लागू न केल्यामुळे दिनांक ३० ऑगस्ट, २०२१ रोजी वा त्या सुमारास वंचित बहुजन आघाडीने औरंगाबाद येथे विभागीय आयुक्त, औरंगाबाद कार्यालयासमोर आंदोलन करुन मुस्लिमांना ५ टक्के आरक्षण देण्यात यावे अशा आशयाचे निवेदन मा.विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना देण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (२१-०६-२०२२) : (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक ०९.०७.२०१४ रोजीच्या अध्यादेशानुसार मुस्लिम (विशेष मागासप्रवर्ग) समाजासाठी नोकरीमध्ये व शैक्षणिक संस्थामध्ये प्रवेशासाठी ५ टक्के आरक्षण देण्यात आले होते. यामध्ये मुस्लिम धर्मातील एकूण ५० मागास घटकांना आरक्षणाचा लाभ अनुज्ञेय राहणार होता. तथापि, याबाबत मा.उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आल्या आहेत. मा.उच्च न्यायालयाने दिनांक १४.११.२०१४ रोजी या प्रकरणी अंतरिम निर्णय दिला आहे. सदर अंतरिम आदेशाद्वारे शासकीय व अनुदानित शैक्षणिक संस्थेमध्ये प्रवेशासाठी दिलेले आरक्षण अबाधित ठेवण्यात आलेले आहे. परंतु खाजगी विनाअनुदानित संस्थांमधील प्रवेश व शासकीय सेवेतील भरतीसाठी दिलेल्या आरक्षणाला स्थगिती दिली आहे. सदर अध्यादेशाचे दिनांक २३.१२.२०१४ पर्यंत कायद्यात रुपांतर न झाल्याने अध्यादेश व्यपगत झाला आहे. तथापि, दिनाक ०९.०७.२०१४ ते दिनांक २३.१२.२०१४ या काळातील शासकीय तसेच अनुदानित शैक्षणिक संस्थांमधील प्रवेश अबाधित ठेवण्यात आलेले आहेत. तसेच दिनांक ०९.०७.२०१४ ते दिनांक १४.११.२०१४ या दरम्यानच्या काळातील शासकीय सेवेत झालेल्या नियुक्त्या अबाधित राहणार आहेत. तथापि आरक्षणाची मर्यादा ५०% पेक्षा जास्त होत असल्यामुळे सद्यस्थितीत सदर आरक्षण देता येणे शक्य होणार नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

शंकरराव चव्हाण सुवर्णमहोत्सवी पत्रकार कल्याण निधीची मदत वाढवून पत्रकारांना लाभ देण्याबाबत

(४६) ४२५८३ (२८-०३-२०२२). श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील पत्रकारांना दुर्धर आजार, अपघात झाल्यास किंवा आकस्मिक मृत्यू झाल्यास त्यांना किंवा त्यांच्या कुटुंबियांस मदत करण्याच्या उद्देशाने शंकरराव चव्हाण सुवर्णमहोत्सवी पत्रकार कल्याण निधीची स्थापना दिनांक १ ऑगस्ट २००९ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरील निधीतुन मिळणाऱ्या मदतीच्या रकमेत शासनाने सन २०१६ नंतर वाढ केली नसल्याने सदरील निधीच्या ठेवीत तसेच देण्यात येणाऱ्या मदतीच्या रकमेत वाढ करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे,
(३) तसेच सदरील निधीतून केवळ अधिस्वीकृतीधारक पत्रकारांनाच मदत मिळत असल्याने जे पत्रकार अधिस्वीकृतीधारक नाहीत त्यांना सदरील निधीतून मदत देण्याची मागणी पत्रकार संघटनांकडून होत असल्याचे निदर्शनास आले असून सरसकट सर्वच पत्रकारांना लाभ देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (१०-०६-२०२२) : (१) होय.
(२) सदरहू निधीत सन २०११ मध्ये रु.२ कोटी, सन सन २०१३ मध्ये रु.३ कोटी, सन २०१५ मध्ये रु.५ कोटी शासनाने सन २०१९ मध्ये रु.१५ कोटी व सन २०२२ मध्ये रु.१० अशी एकूण रु.३५ कोटी इतक्या रक्कमेची वाढ केली असून देण्यात येणाऱ्या निधीमध्ये वाढ करण्यासाठी दि.१४.५.२०१८ च्या शासन निर्णयामध्ये शासकीय सदस्यांची समिती गठीत करण्यात आली.

सदर समितीने आजाराची व्याप्ती व रक्कम वाढ करण्याची शिफारस शासनास केली असून सदर प्रस्ताव शासनाच्या विचाराधिन आहे.

(३) शासन निर्णय क्रमांक-माजम-२०११/ प्र.क्र.३८२/ ३४, दिनांक १७ ऑक्टोंबर, २०११ च्या शंकरराव चव्हाण सुवर्ण महोत्सवी पत्रकार कल्याण निधी मधून विहित मदत मिळण्यासाठी पात्रतेच्या निकषानुसार अधिस्वीकृतीधारक पत्रकार हा संवर्ग पात्र आहे. जे अधिस्वीकृतीधारक नाहीत अशा पत्रकारांना शंकरराव चव्हाण सुवर्ण महोत्सवी पत्रकार कल्याण निधी मधून मदत देण्याचा प्रत्साव शासनास प्राप्त झालेला नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

अकोट (जि.अकोला) तालुक्यातील अकोला-पोपटखेड- शहानुर या महामार्गाची खड्डयांमुळे झालेली दुरवस्था

(४७) ४२६१३ (१०-०४-२०२२). श्री.प्रकाश भारसाकळे (अकोट) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोट (जि.अकोला) तालुक्यातील प्रसिद्ध नरनाळा किल्ल्याकडे जाणाऱ्या अकोला-पोपटखेड-शहानुर या महामार्गाची खड्ड्यांमुळे दुरवस्था झाली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पोपटखेड ते शहानुर या मार्गावर ठिकठिकाणी खड्डे पडले असल्याने वाहनधारकांना त्याचा त्रास सहन करावा लागत आहे, ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संबंधित विभागाने हा रस्ता लवकरात लवकर दुरुस्त करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (२४-०६-२०२२) : (१) व (२) हे खरे आहे.

सदर रस्ता दर्जोन्नत होऊन सन २०२०-२१ मध्ये जिल्हा परिषद अकोला यांच्याकडून सार्वजनिक बांधकाम विभागाकडे प्रजीमा ३४ म्हणून हस्तांतरीत झाला आहे.

(३) सदर रस्त्याची एकूण लांबी १४.५० कि.मी. इतकी आहे. यापैकी ५ कि.मी. लांबीत व्दिवार्षीक देखभाल व दुरुस्तीचे काम प्रगतीत आहे व ५ कि.मी. लांबीत जिल्हा नियोजन व विकास योजने अंतर्गत मंजुर काम वन विभागाचे ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर करण्यात येत आहे. उर्वरित ४.५० कि.मी. लांबी ही वाहतुकीस योग्य आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

सोलापूर जिल्ह्यातील उजनी ते सोलापूर जलवाहिनी टाकण्यासाठी जागा ताब्यात नसताना पोचमपाड कंपनीस वर्कऑर्डर दिल्याबाबत

(४८) ४२९७६ (२६-०४-२०२२). श्री.विजयकुमार देशमुख (सोलापूर शहर उत्तर) : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्ह्यातील उजनी ते सोलापूर जलवाहिनी टाकण्यासाठी जागा ताब्यात नसताना तसेच मक्तेदारांकडून बँक गॅरंटी घेतली नसतानाही पोचमपाड कंपनीस वर्कऑर्डर देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे पिण्याच्या पाण्याची योजना प्रलंबित राहिली तसेच विजय इन्फ्रा कंपनीस काम देण्याच्या प्रक्रियेबाबत मुख्यलेखा परिक्षकांनी काढलेल्या त्रुटींची पूर्तता केली नसल्याचे दिनांक १४ डिसेंबर, २०२२ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत मक्तेदारांकडून निविदा मागविण्यात आली आहे काय, सदर निविदा कोणत्या नियम व अटी अंतर्गत मंजूर करण्यात आल्या तसेच याबाबत संबंधित अधिकाऱ्याकडून तपासणी करण्यात आली आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (२२-०६-२०२२) : (१) हे अंशत: खरे आहे.

सोलापूर जिल्ह्यातील उजनी ते सोलापूर जलवाहिनी टाकण्यासाठी जागा ताब्यात नसताना दिनांक ०९ सप्टेंबर, २०१९ रोजी सोलापूर स्मार्ट सिटी लिमिटेडकडून सदर प्रकल्पाचे कार्यादेश देण्यात आले होते. तसेच, संबंधित कंत्राटदाराकडून नियमानुसार बँक गॅरंटी घेण्यात आली आहे.

(२) सोलापूर जिल्ह्यातील उजनी ते सोलापूर जलवाहिनी टाकण्यासाठी आवश्यक जमीन उपलब्ध होण्यास विलंब झाला. तदनंतर सोलापूर महानगरपालिकेकडून राष्ट्रीय महामार्गाच्या जागेतून सदर जलवाहिनी टाकण्याकरीता जमीन उपलब्ध करुन दिलेली आहे.

तथापि, कंत्राटदाराने विहीत मुदतीत काम करण्यास असमर्थता दर्शविल्याने सदर निविदा रद्द करण्यात आली आहे.

मे. विजय इन्फ्रा कंपनीस शहरातील १०.८० कि.मी. लांबीचे रस्ते करण्याचे काम देण्यात आले होते. तथापि, याबाबत लेखापरिक्षणात आक्षेप आलेले असून सदर आक्षेपांबाबत पुर्तता अहवाल मुदतीत करण्याची सोलापूर स्मार्ट सिटी लिमिटेडकडून दक्षता घेण्यात येत आहे.

(३) व (४) सोलापूर शहरातील १०.८० कि.मी. लांबीच्या रस्त्याच्या पुनर्विकास करण्याच्या कामाची निविदा शासनाच्या महा ई- टेंडर या संकेतस्थळावर सोलापूर स्मार्ट सिटी मार्फत प्रसिद्ध करण्यात येवून सदर निविदा प्रसिद्ध करताना नियम व अटींचा समावेश करण्यात आला होता.

सदर नियम व अटीनुसार स्मार्ट सिटी अंतर्गत नियुक्त प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार व मुख्य सल्लागार यांच्यामार्फत सदर निविदेचे मूल्यमापन करण्यात आलेले असून तत्कालीन मुख्य तांत्रिक अधिकारी व उपमुख्य तांत्रिक अधिकारी यांचे मार्गदर्शनानुसार निविदेच्या मूल्यमापनानंतर सदर रस्ते कामाची निविदा मंजूर करण्यात आलेली आहे.

नागपूर येथील स्मार्ट सिटी प्रकल्पग्रस्तांना घरे व जमिनीचा मोबदला देण्याबाबत

(४९) ४३०८९ (३१-०३-२०२२). श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण) : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील स्मार्ट सिटी प्रकल्पग्रस्तांना पुनर्वसन व पुनर्वसाहत धोरणानुसार त्यांच्या संपादीत जमिनीचा मोबदला देण्याची सुरु असलेली कार्यवाही पूर्ण झाली आहे काय,

(२) असल्यास, या प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी बांधलेल्या सदनिकांचे वाटप कधीपासून करण्यात येणार आहे वा करण्यात येणार आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. एकनाथ शिंदे (२२-०६-२०२२) : (१) नागपूर स्मार्ट सिटी प्रकल्पांतर्गत प्रस्तावित क्षेत्राधिष्ठित विकास या घटकांतर्गत मौजा पारडी, भरतवाडा, पूनापूर व भांडेवाडी येथे शासनामार्फत नगररचना परियोजना मंजूर करण्यात आली आहे.

प्रस्तावित प्रकल्पामुळे बाधित होणाऱ्या मिळकती / जागेची मोजणी होऊन नागपूर विशेष उद्देश वहनाच्या संचालक मंडळाने मंजूर केलेल्या पुनर्वसन व पुनर्वसाहत धोरणानुसार विविध घटकांतर्गत माहे एप्रिल, २०२२ पर्यंत सुमारे २२१ प्रकल्प बाधितांस पुनर्वसन लाभांतर्गत एकूण रु. १०.१८ कोटी रक्कम वाटप करण्यात आली आहे.

सद्यस्थितीत ज्या रस्त्यांच्या लगत प्रकल्प बाधितांचे सर्वेक्षण होऊन मोबदला अनुज्ञेय झाला आहे, अशाच ठिकाणी रस्त्यांची विकासकामे सुरु असून उर्वरीत प्रस्तावित रस्त्यांच्या ठिकाणी सर्वेक्षण व मोजमाप करण्याचे कार्य प्रगतीपथावर आहे.

(२) व (३) मुख्य कार्यकारी अधिकारी, नागपूर विशेष उद्देश वहन यांचेकडून कळविण्यात आल्यानुसार, मौजा पुनापूर येथे हौसिंग फॉर डिसहाऊस्डसाठी आरक्षित असलेल्या जागेवर प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी सदनिकांचे बांधकाम प्रगतीपथावर आहे. सदर बांधकाम पूर्ण झाल्यानंतर सदर सदनिका पात्र प्रकल्प बाधितांस वाटप करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

आर्वी (जि.वर्धा) तालुक्यातील नविन प्रशासकीय इमारतीच्या बांधकामाचा दर्जा निकृष्ट असल्याबाबत

(५०) ४३५०९ (३०-०३-२०२२). श्री.दादाराव केचे (आर्वी) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आर्वी (जि.वर्धा) तालुक्यातील रस्त्याची अती महत्वाची कामे मंजुर करण्याबाबत पत्राद्वारे मागणी करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आर्वी तालुक्यातील पत्रामध्ये नमूद केलेली रस्ते अत्यंत खराब असल्याने त्यावर चालणे सुध्दा कठीण असल्याने या रस्त्याकरिता शासन निधी उपलब्ध करून देणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गत वर्षातील वर्षाचे अर्थसंकल्पात आर्वी तालुक्याकरीता कोणताही निधी उपलब्ध करून दिला नसल्यामुळे पत्राद्वारे मागणी करण्यात आलेल्या रस्त्यांकरिता निधी देण्याबाबत शासनाने तातडीने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. अशोक चव्हाण (२७-०६-२०२२) : (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर रस्त्यांची कामे निकष, मंजूरी व निधी उपलब्धतेच्या अधीन राहून हाती घेण्याचे नियोजन राहील.

(३) हे खरे नाही.

सन २०२१-२२ च्या अर्थसंकल्पात रु.४.५ कोटी किंमतीचे व सन २०२२-२३ च्या अर्थसंकल्पात रु.१.७१ कोटी किंमतीचे रस्ते व पुलाचे काम अर्थसंकल्पित करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

विधान भवन :
नागपूर.

राजेन्द्र भागवत
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.